रायगड, रविवार, दि. १० नोव्हेंबर २०२४

कृषीवल

किंमत ४ ₹

चिऊताईंचा आज प्रचार दौरा

अलिबाग : महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचाराचा झंझावात अलिबाग तालुक्यातील अनेक भागांममध्ये सुरू आहे. अलिबाग तालुक्यातील बेलोशी जिल्हा परिषद मतदारसंघामधील बेलोशीसह अनेक गावांमध्ये रविवारी (दि.१०) दुपारनंतर चिऊताई यांचा प्रचार दौरा असल्याची माहिती शेकाप कार्यालयाकडून देण्यात आली आहे. अलिबाग तालुक्यातील बेलोशी येथील शेकापचे कार्यकर्ते सतीश वारगे यांच्या निवासस्थानाकडून सायंकाळी चार वाजल्यापासून प्रचाराला सुरुवात होणार आहे. •➤ पान ५ वर

मतदानासाठी ओळखपत्र पुरावे ग्राह्य

रायगड : विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदान करण्यासाठी ज्या मतदारांचे मतदार यादीत नाव आहे, अशा मतदारांकरिता भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. १२ प्रकारच्या ओळखपत्रांपैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदान करता येणार आहे, अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये •➤ पान ५ वर

सत्ताधाऱ्यांकडून विकासाच्या फक्त गप्पाच...

मृत्यूनंतरही यातना संपेना!

- पक्का रस्ता नसल्याने झोळीचा वापर
- पेणमधील विदारक चित्र

। पेण । प्रतिनिधी ।

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत मतदारराजाला पुढील पाच वर्षांची रंगीत स्वप्ने दाखविण्यात राजकीय पक्ष मशगुल असताना सर्वांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालेल असे विदारक चित्र पेण तालुक्यात समोर आले आहे. एका अभागी आदिवासी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तिचा मृतदेह घरापर्यंत नेण्यासाठी मात्र चार किमीची पायपीट करावी लागली. केवळ पक्का रस्ता नसल्याने ही वेळ आदिवासी कुटुंबावर आली. रस्ता तयार करण्यासाठी ठेकेदाराला दिलेले साडेसात कोटी कोणाच्या खिशात गेले, हा प्रश्न आता ऐरणीवर आलेला आहे. पेण शहरापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या खवसावाडीतील ही विदारक काहाणी आहे.

पेण तालुक्यातील खवसा ही छोटी आदिवासीवाडी आहे. या वाडीतील आंबी कडू (४२) ही महिला आजारी होती. तिला उपचारासाठी अलिबाग जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, गुरूवारी तिचा मृत्यू झाला. आंबी कडू यांचा मृतदेह रुग्णवाहिकेतून पेणपर्यंत आणण्यात आला. शहरापासून पाच किमी अंतरावर बोरगाव ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या खवसा आदिवासीवाडीपर्यंत जायला पक्का रस्ताच नाही. त्यामुळे कोणतीही •➤ पान ५ वर

अधिकारी आले चोरपावलांनी

सदरील घटना झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी अधिकारीवर्गाला जाग आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, गटविकास अधिकारी लता मोहिते, कार्यकारी अभियंता राहुल देवांग, पाणीपुरवठा विभागाचे •➤ पान ५ वर

> या मतदारसंघामधील वाड्या-वस्त्यांमध्ये आजही पायाभूत सुविधांची समस्या गंभीर आहे. रस्ते, पाणी, वीजपुरवठ्यापासून आदिवासी बांधव वंचित आहेत. आरोग्याची समस्या उद्भवल्यास सुसज्ज रुग्णालय नाही. या सर्वाला जबाबदार इथले नेतृत्व आहे. कारण, त्यांनी या समस्यांवर काहीच काम केलेले नाही. या सर्व गोष्टी येत्या काळात करणे गरजेचे आहे. त्या करण्यास माझे प्रथम प्राधान्य असेल.
>
> – अतुल म्हात्रे, उमेदवार पेण मतदारसंघ

आमदाराची बोलती बंद

जयंत पाटील यांनी घेतला समाचार | **नागावमध्ये चित्रलेखा पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ**

। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।

विधिमंडळात आपली बोलती बंद ठेवून काहीही न बोलण्याचा विक्रम विद्यमान आमदारांनी केला आहे. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी विधिमंडळाचे आयुध वापरुन कामे होणे गजरेचे होते. परंतु, आमदारांनी गेल्या पाच वर्षांत काय केले, असा सवाल शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केला. आमदारांच्या न बोलण्यामुळे या मतदारसंघातील प्रश्न सोडवण्यात ते निष्क्रिय ठरले आहेत, असे टीकास्त्र सोडून आ. दळवींचा चांगलाच समाचार जयंत पाटील यांनी घेतला.

टक्केवारी घेणारा आमदार

विद्यमान आमदाराने निवडून आल्यावर खूप काही घेतले. सध्या नागावकरांना पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. आताही निधी आणून तो प्रश्न मिटवू शकतो. परंतु, विद्यमान आमदार त्यातही टक्के घेतील आणि आपल्या कामात आडकाठी आणून काम थांबतील. यामुळे अधिकारीदेखील हैरण झालेले आहेत. तसेच, आपण कामाचं पत्र दिलं की आमदाराचे पत्र दाखल होते. यामुळे पाठपुरावा आपण करायचा आणि त्याचे क्रेडिट त्यांनी घ्यायचे, हे पटण्यासारखं नाही, असे जयंत पाटील म्हणाले.

पर्यटनाच्या विकासावर भर

काही वर्षात या भागातून जाणाऱ्या रेवस-रेड्डी रस्त्यामुळे येथील पर्यटनात कमालीची वाढ होणार आहे. नागाव हे पर्यटनाचे हब होत आहे. तसेच, येथील पुरातन मंदिरं जी आहेत, तेच नागावचे वैभव आहे. पुढील पाच वर्षांत येथील मंदिरे आणि परिसर चांगला प्रेक्षणीय आणि पर्यटकांचे आकर्षण बनविण्याचा काम आपण करू. यामुळे येथील जनतेच्या रोजगाराचा प्रश्नदेखील लवकर मिटेल. यामुळे येथील पर्यटनाच्या विकासावर जास्त भर देणार असल्याची ग्वाही जयंत पाटील यांनी दिली.

अलिबाग-मुरुड-रोहा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताईंच्या प्रचाराचा शुभारंभ शनिवारी (दि. ९) नागाव येथे करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

जयंत पाटील पुढे म्हणाले की, मी जेव्हा विधिमंडळात होतो, तेव्हा पूर्ण वेळ सभागृहात बसायचो. आताच्या उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यादेखील विधिमंडळाचे आयुध वापरून सर्वसामान्यांचे प्रश्न सभागृहात मांडतील. आताच्या तरूण पिढीला आपल्या आमदाराने आपले प्रश्न सभागृहात मांडणे अपेक्षित असते. याचबरोबर आमदाराने •➤ पान ५ वर

दळवी जाहिरातबाजीत झकास सहाणगोठीतील रस्ते भकास

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील सहाणगोठी येथील आदिवासीवाडीतील रस्त्याच्या कामांचा शुभारंभ आठ महिन्यांपूर्वी महेंद्र दळवी यांनी थाटामाटात केला. प्रत्यक्षात मात्र रस्त्यावर साधी खडीदेखील पडली नसल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे आमदारांची जाहिरातबाजी झकास, मात्र आदिवासीवाडीतील रस्ता भकास अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी आणून गावे, वाड्यांचा विकास केल्याच्या बतावण्या आमदार दळवी यांनी जाहिरातीच्या माध्यमातून केल्या. प्रत्यक्षात मात्र अनेक गावांचा विकास झाला नसल्याची माहिती यातून उघड होत आहे.

मागीलविधानसभा निवडणुकीत आमदार दळवी यांनी अलिबाग-रोहा रस्त्याचे भांडवल करीत मते मिळविली होती. स्वखर्चाने रस्ता बनवून देईन, असे आश्वासन एका सभेमध्ये दिले होते. प्रत्यक्षात मात्र अलिबाग-रोहा मार्गावरील रस्ता पाच वर्षांत दुरुस्ती करण्यात आमदार अपयशी ठरले असल्याची चर्चा आहे. या रस्त्याचे काम रखडलेले आहे. त्याचा नाहक त्रास प्रवाशांना होत आहे. त्यामुळे आमदारांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. अलिबाग तालुक्यातील सहाण ग्रामपंचायतीच्या हद्दीत सहाणगोठी आदिवासीवाडी आहे. दोनशेहून अधिक लोकवस्ती असलेलल्या या वाडीतील रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन आमदार दळवी यांनी केले. मोठ्या थाटामाटात या कामाचा शुभारंभ नारळ वाढवून करण्यात आला होता. आठ ते नऊ महिन्यांपूर्वी करण्यात आलेल्या या भूमीपूजनाचे काम लवकरच सुरु होऊन पूर्ण होईल, अशी अपेक्षा आदिवासीवाडीतील नागरिकांना होती. परंतु, त्यांची घोर निराशा झाली आहे. भूमीपूजन करून अनेक महिने उलटून गेले आहेत. तरीदेखील या रस्त्याचे काम पूर्ण झाले नसल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

> आमदार दळवी यांनी आदिवासीवाडीतील रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन केले. परंतु, अजूनपर्यंत रस्त्याचे काम सुरु झाले नाही. आजही तो रस्ता तसाच आहे.
>
> – ग्रामस्थ, सहाणगोठी आदिवासीवाडी (नाव न सांगण्याच्या अटीवरून)

> सहाण ग्रामपंचायत हद्दीतील सहाणगोठी आदिवासीवाडी रस्त्याच्या कामासाठी निधी आला. आठ महिन्यांपूर्वी थाटामाटात नारळफोडीचा कार्यक्रम पार पडला. परंतु, रस्त्याचे काम अजूनही झाले नाही.
>
> – अनिल पाटील, शेकाप तालुका चिटणीस, अलिबाग

रस्त्याच्या कामाची जाहिरातबाजीदेखील मोठ्या प्रमाणात केली होती. विकासकामांच्या जाहिरातीचे फलक लावून मोठ्या प्रमाणात त्याचा प्रसार केला. परंतु, आमदारांची जाहिरात झकास, मात्र रस्त्याचे काम अजूनही भकास अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. वाडीतील ग्रामस्थांच्या घरांचे काम चालू असल्याने रस्त्याचे काम लांबणीवर गेले होते. परंतु, त्यानंतर ठेकेदाराने या रस्त्याकडे ढुंकूनही पाहिले नसल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. त्यामुळे सहाणगोठी आदिवासी वाडीतील रस्त्याचे काम कागदावरच राहणार नाही ना, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चेला ऊतही आला आहे.

परहूरचे युवा कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्षात

- जयंत पाटील यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश सोहळा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन परहूर गावातील व परिसरातील असंख्य युवा कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्षात सामील झाले आहेत. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यामुळे चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या विजयाची नांदी स्पष्ट झाल्याचे चित्र आहे.

यावेळी सुरेश घरत, प्रकाश म्हात्रे, संजय माळी, सुरेश गजने, कैलास गजने, जे.पी. घरत, विनोद खोपकर आदी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व तरुण वर्ग उपस्थित होते.

परहूर येथील प्रकाश पाटील यांच्या निवासस्थानी हा पक्षप्रवेश सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. शेतकरी कामगार •➤ पान ५ वर

अलिबाग शहरात प्रचाराचा धडाका

प्रशांत नाईक, प्रवीण ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांचा प्रचार अलिबाग शहरात वेगाने सुरू आहे. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, काँग्रेसचे राज्य प्रदेश सचिव ॲड. प्रवीण ठाकूर, जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि.९) अलिबाग शहरातील कोळीवाड्यासह चेंढरे व अन्य परिसरात प्रचाराचा धडाका दिसून आला. पदाधिकारी, कार्यकर्ते महिला, तरुण या प्रचारात मोठ्या संख्येने सहभागी होऊन चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना निवडून देण्यासाठी कामाला लागल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

कोळीवाड्यातील खंडोबाचे दर्शन घेऊन प्रशांत नाईक यांच्या हस्ते नारळ वाढवून प्रचाराला सुरुवात झाली. तर, चेंढरेमधील रोहिदासनगर येथील साईबाबांचे दर्शन घेऊन प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. दरम्यान, चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील वॉर्ड क्रमांक एक ते तीनमधील रोहिदास नगर, शिवाजी नगर, नागडोंगरी, विद्यानगर, पंतनगर, •➤ पान ५ वर

शेतकऱ्यांच्या कष्टाची राखरांगोळी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील कोदिवले येथील शेतकऱ्यांच्या शेतातून कापून आणलेला भाताच्या मोळ्यांना आग लावण्यात आली आहे. पाच शेतकऱ्यांनी साठवून ठेवलेले २५० हून अधिक भाताचे भारे पहाटे ३.३० ते ४ च्या सुमारास आग लावून पेटवून दिल्याची घटना घडली आहे.

नेरळ-कळंब रस्त्यावरील दहिवली ग्रामपंचायत हद्दीतील कोदिवले येथे रात्री येथील पाच शेतकऱ्यांच्या शेतातील भाताचे भारे साठवून ठेवले होते. तेथील शेतकरी भगवान तरे, केशव तरे, नाना तरे आणि संतोष तरे यांच्या सामूहिक भातशेतीतून पिकविलेल्या •➤ पान ५ वर

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अपघात

- सुरक्षा यंत्रणा तातडीने घटनास्थळी पोहोचल्याने मोठी हानी टळली

। खोपोली । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मुंबई लेनवर खोपोली एक्झिटजवळ नवीन बोगद्यादरम्यान फरशी वाहून नेणारा ट्रक शोल्डर लेनवर बंद पडलेल्या अवस्थेत उभा होता. यावेळी मागून येणाऱ्या बाळूमामा ट्रॅव्हल्सच्या खासगी बसने चुकीच्या बाजूने ओव्हर टेक करत ट्रकला मागून जोरदार धडक दिली. पहाटे पाच वाजताच्या सुमारास हा प्रकार घडल्याने मोठा गोंधळ उडाला. बसचा पुढील भाग पूर्णतः दबला गेला आणि केबिनमधील चालकासह पाच जण त्यात अडकले. मागील भागातील प्रवाशीदेखील जखमी झाले आहेत.

सदर बस कोल्हापूर येथून मुंबईकडे जात असताना हा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच मार्ग वाहतूक पोलीस यंत्रणेच्या बोरघाट आऊट पोस्टचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. आयआरबी पेट्रोलिंग, एमएसआरडीसीची •➤ पान ५ वर

सुडकोलीतील प्रचारादरम्यान विरोधकांचा समाचार

तुमची हाक, माझी साद

चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताईंची ग्वाही

। रायगड । प्रतिनिधी ।

अलिबाग मतदारसंघातील जनता विकली जाणार नाही, ती नेहमीच शेकापच्या सोबत ठाम आहे. आयुष्य सोपं नाही. शेतीतून पैसे मिळतात. येथील तरूण कमाईसाठी मुंबईत जातो आणि कष्ट करून गावाच्या विकासात हातभार लावतात. त्यांना लाल सलाम. तुम्ही हाक मारली, मी साद दिली आहे, तुमचा अधिकार आणि माझे कर्तव्य आहे. माझे काम जनतेने पाहिले आहे. या परिसरातील मतदारांवर माझा पूर्ण विश्वास आहे. अलिबाग तालुक्याचा विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. मला विधानसभेत पाठवा, मी अलिबाग-रोहा रस्ता आणि भोनंग-तळवली रस्ता बनविणार आहे. त्यासाठी लागणार निधी मिळविण्याचा प्रयत्न करणार असल्याची ग्वाही चित्रलेखा पाटील यांनी दिली.

मतांचा जोगवा मागण्यासाठी केवळ आश्वासनांचे गाजर दाखविणाऱ्या आमदाराविरोधात मतपेटीतून आपला संताप व्यक्त करावा आणि 'शिट्टी' या चिन्हावर बटण दाबून महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराला बहुमताने विजयी करा, असे आवाहनदेखील चिऊताईंनी यावेळी मतदारांना केले. सुडकोली येथील शेकपक्षाचे ज्येष्ठ नेते अनंत पाटील यांच्या निवासस्थानी महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ •➤ पान ५ वर

विकासाची पंचसूत्री राबवणार

■ शरद पवार यांचे आश्वासन

। वसमत । वृत्तसंस्था ।

महाविकास आघाडी सत्तेत आल्यास विकासाची पंचसुत्री राबवून सर्वांगीण विकास साधणार असल्याचे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी दिले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार जयप्रकाश दांडेगावकर यांच्या प्रचारार्थ वसमत येथे सायंकाळी सात वाजता जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शरद पवार, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार फौजिया खान, आमदार प्रज्ञा सातव, माजीमंत्री कमलकिशोर कदम, शिवसेना संपर्कप्रमुख बबनराव थोरात, दिलीप चव्हाण, दिलीपराव देसाई, माजी आमदार मुंजाजीराव जाधव, माजी आमदार पंडीतराव देशमुख,डॉ मारोती क्यातमवार, अ.हफिज अ रहेमान, सुनिल काळे यांसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, महिलांसिठी महालक्ष्मी योजना आणणार असून, महिलांना दरमहा ३००० रुपये तसेच महिला व मुलींना एसटीमध्ये मोफत प्रवास योजना, शेतकऱ्यांना ३ लाख रुपये कर्ज माफ केले जाईल तसेच नियमित कर्जफेड करणारे शेतकऱ्यांना पन्नास हजार पंच प्रोत्साहन अनुदान दिले जाईल, आरोग्य सेवेमध्ये नागरिकांचा २५ लाख रुपयेत्यांना उत्तरासाठी मोफत औषधी उपलब्ध करून दिली जाईल, जातनिहाय जनगणना करून आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून वाढवत गरजूंना आरक्षण दिले जाणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. केंद्र सरकारने शेतकरी विरोधी धोरण राबवल्यामुळे आज शेतीमालाला योग्य भाव नाही तसेच बियाणे औषधी खते यांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचे दाम मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला. यासाठी मोदी सरकारचे शेतकरी विरोधी धोरण कारणीभूत असल्याचा आरोप त्यांनी केला. मोदी सरकारने देशातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण केल्या नाहीत, त्यामुळे मागील लोकसभा निवडणुकीमध्ये मतदारांनीत्यांनात्यांचीजागादाखवून दिली आहे लोकसभा निवडणुकीत चारशे जागा मिळणार असल्याची सांगणाऱ्या मोदी सरकारला ४०० जागा मिळाल्यास नाहीत उलट चंद्राबाबू नायडू व नितिश कुमार यांच्या साथीने सरकार स्थापन करावे लागले महाराष्ट्रातील जनतेने मोदी सरकारला लोकसभा निवडणुकीत चांगलाच धक्का दिल्याचेही त्यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीत जनतेने महाविकास आघाडीला मतदानातून साथ दिल्यास महाविकास आघाडी राज्यात सत्ता स्थापन करून पाचही कार्यक्रम ांची अंमलबजावणी करेल असा विश्वास त्यांनी मतदारांना दिला. तत्पूर्वी, प्रास्ताविकात जयप्रकाश दांडेगावकर यांनी मी मागील निवडणुकीत पवारसाहेबांनी माझ्या एकाशब्दावरतिकीटदिलेमीचुकलो, पण त्याचा त्रास शेवटपर्यंत झाला चुक अल्याचे सांगून जिल्ह्यातील तिन्ही आमदार सत्ताधारी पक्षाचे असताना पीक विमा मिळवता आला नाही, असे म्हणाले. यावेळी खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार फौजिया खान, आमदार प्रज्ञा सातव, अ.हफिज, डॉ मारोती क्यातमवार, बबनराव थोरात, भीमराव हत्तीअंबीरे यांनी मार्गदर्शन केले. सभेला हजारोंच्या संख्येने नागरीक उपस्थित होते. सूत्रसंचालन दौलत हुंबाड व आनंद बडवणे यांनी केले.

ठाकरे गटाच्या महिला पदाधिकाऱ्याला नोटीस

। कल्याण । वृत्तसंस्था ।

कल्याण पूर्वेतील उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातील महिला पदाधिकारी आशा रसाळ यांना कोळसेवाडी पोलिसांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६८ प्रमाणे नोटीस बजावली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपणाकडून किंवा आपल्या समर्थकांकडून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी घेण्याचे नोटिसीमध्ये म्हटले आहे.

आशा रसाळ कल्याण पूर्वेतील उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या लढवय्या महिला पदाधिकारी म्हणून ओळखल्या जातात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेतून बाहेर पडल्यावर शिंदे शिवसेनेने डोंबिवली, कल्याण परिसरातील जुन्या शिवसेना शाखा आपल्या ताब्यात घेण्याचे सत्र सुरू केले होते. या कालावधीत कल्याण पूर्वेत कोळसेवाडीमधील जुनी शिवसेना शाखा शिंदे शिवसेनेकडून ताब्यात घेण्याचे प्रयत्न सुरू होते.

यावेळी ठाकरे आणि शिंदे शिवसेनेचे दोन्ही गट एकमेकांना भिडले होते. शिवसेनेचा एक बडा नेता यावेळी उपस्थित होता. ठाकरे गट शिवसेना शाखेचा ताबा सोडण्यास तयार नव्हता. तर या नेत्याच्या पाठबळामुळे शिंदे शिवसेनेचे शिवसैनिक कोळसेवाडी शिवसेना शाखा ताब्यात घेण्यासाठी जोरदार प्रयत्न करत होते. या दोन्ही गटाकडून सुरू असलेल्या झटापटीच्यावेळी ठाकरे गटाच्या महिला पदाधिकारी आशा रसाळ यांनी शिंदे शिवसेनेच्या एका बड्या नेत्याच्या शर्टाची गळपट्टी पकडून आम्ही कोणत्याही परिस्थितीत शाखेचा ताबा सोडणार नाही, असे सुनावले होते. हा विषय नंतर दाबण्यात आला. पण, प्रत्यक्षदर्शींनी मात्र हा प्रकार बघितला होता. ठाकरे गटाने कल्याण पूर्वेत दिलेल्या उमेदवाराविषयी यापूर्वी आशा रसाळ यांनी आक्रमक भूमिका मांडली होती. आशा रसाळ या लढवय्या महिला शिवसैनिक असल्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांनी आशा रसाळ यांना नोटीस बजावली आहे.

२ कोटी ९० लाखांचा ऐवज जप्त

■ जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांची माहिती

। चंद्रपूर । वृत्तसंस्था ।

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात आतापर्यंत व इतर बाबी मिळून एकूण २ कोटी ९० लक्ष रुपयांचा ऐवज जप्त केला, अशी माहिती जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिली. यात बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात १६ लक्ष ३० हजार, ब्रम्हपुरी -५४ लक्ष ३९ हजार, चंद्रपूर- ४३ लक्ष, चिमूर- १९ लक्ष ८८ हजार, राजुरा -२४ लक्ष ६७ हजार आणि वरोरा- मतदारसंघात १ कोटी ३२ लाखांच्या जप्तीचा समावेश आहे, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी ३ ने वाढली होती, विधानसभा निवडणुकीमध्ये ही टक्केवारी आणखी वाढण्यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहे.

यात सायकल रॅली, रन फॉर व्होट, पोस्टर्स, रिल्स, निबंध, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धासुध्दा आयोजित करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील दिव्यांग मतदार तसेच ज्येष्ठ मतदारांच्या मदतीसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर स्वयंसेवक नेमण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर किमानमुलभूतसुविधापुरविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. चंद्रपूर, बल्लारपूर आणि वरोरा विधानसभा मतदारसंघात १६ पेक्षा जास्त उमेदवार असल्याने प्रत्येक मतदान केंद्रावर दोन ईव्हीएमचा उपयोग होणार आहे. जिल्ह्यात अतिरिक्त ईव्हीएम असून, कुठेही कमतरता नाही. जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील एकूण २०७७ मतदान केंद्राकरिता ३८०८ बॅलेट युनिट, २४९० कंट्रोल युनिट आणि २६७८ व्हीव्हीपॅट उपलब्ध आहेत.

राजन तेलींच्या प्रचाराचा सावंतवाडी येथून प्रारंभ

सावंतवाडी : येथील विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजन तेली यांच्या प्रचाराचा शुभारंभ श्री देव पाटेकर आणि श्री देव उपरलकर चरणी श्रीफळ वाढवून करण्यात आला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख मायकल डिसोजा, शहर प्रमुख शैलेश गवंडळकर, साक्षी वंजारी, उमेश कोरगावकर, निशांत तोरस्कर, प्रथमेश तेली, आशिष सुभेदार, राजू मसुरकर, उदय राणे, बाबल्या दुभाषी, शब्बीर मणियार, कल्पना शिंदे, संदीप वेंगुर्लेकर, समीरा खलील, फलकरा शेख, विजया राजपूत उपस्थित होते.

भाजपला संविधान संपवायचे आहे

। नागपूर । वृत्तसंस्था ।

नक्षलवादामुळे सर्वाधिक नुकसान काँग्रेसचे झाले आहे. आमचे पहिल्या फळीतील नेते शहीद झाले. जे भाजपचे लोक आम्हाला नक्षली संबोधतात त्यांचे नक्षलवाद्यांमुळे काहीच नुकसान झाले नाही. नक्षलवादी भारतीय संविधानाला मानत नाहीत आणि भाजपलाही संविधान संपवायचे आहे. संविधानाच्या मुद्द्यांवर नक्षलवादी आणि भाजपमध्ये समानता आहे, असा जोरदार हल्ला छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री व काँग्रेस नेते भूपेश बघेल यांनी भाजपवर केला. भूपेश बघेल नागपूर प्रेस क्लब आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

■ माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा हल्लाबोल

उपमुख्यमंमत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याकडील लाल रंगाचे मुखपृष्ठ असलेल्या संविधानाच्या प्रतिबाबत आक्षेप घेतला होता. त्यावरही बघेल यांनी भाष्य केले. ते म्हणाले, देवीच्या दुपट्ट्याचा रंग लाल, भगवान हनुमान यांचा रंग लाल, उगवता आणि माळवता सूर्य लाल असतो. मग, फडणवीस यांना लाल रंगाचा इतका त्रास का होत आहे? त्यांची मुख्यमंत्री पदावरून उपमुख्यमंत्री अशी पदावनती झाल्याने ते नैराश्यात आहेत. त्यामुळे फडणवीस वाटेल ते बोलत सुटले आहेत. राहिला प्रश्न त्यांनी केलेल्या नक्षलवादाच्या आरोपाचा तर नक्षलवादामुळे सर्वाधिक नुकसान काँग्रेसचे झाले आहे. आमचे पहिल्या फळीतील नेते शहीद झाले. माजी केंद्रीय मंत्री विद्याचरण शुक्ल, नंदकुम ार पटेल, बस्तर टायगर महेंद्र कर्मा यांच्यासह काँग्रेसचे २९ लोक शहीद झाल्याचे त्यांनी सांगितले.

'लाडकी बहीण' योजना काँग्रेसचीच

काँग्रेसने लाडकी बहीणसारखी योजना हिमाचल प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणामध्ये सुरू केली आहे. आम्ही जेव्हा ही योजना सुरू केली, तेव्हा भाजपचे लोक या योजनेस 'रेवडी' म्हणून हिणवत होते. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने भाजपला जोरदार धक्का दिला. त्यानंतर भाजपने या योजनेची नक्कल केली. महाराष्ट्रात आमचे सरकार आल्यानंतर ही योजना यशस्वीपणे चालवण्यात येईल, असेही बघेल म्हणाले.

मतटक्का वाढविण्यासाठी जादूगार मैदानात!

। नागपूर । वृत्तसंस्था ।

लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का मोठ्या प्रमाणात घसरला होता. त्यामुळे प्रशासनासोबतच राजकीय नेत्यांसह पक्षाची झोप उडाली होती. आता विधानसभेच्या निवडणुका काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहे. त्या पार्श्वभूमीवर अनेक क्षेत्रातून मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

निवडणूक आयोगाकडून देखील मतदानाचा टक्का वाढवा यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात आहे. काही राजकीय पक्ष आणि अपक्षांनी मतदारांमध्ये उमेदवाराचा प्रचारासह मतदनाबद्दल जनजागृती करण्यासाठी जादूगार आणि लोककलावंतांची मदत घेतली जात असल्याचे चित्र आहे. राजकारणात अनेक जादूगार असतात. ते आपल्या जादूच्या जोरावर सत्तांतर करीत असतात. मात्र, मतदानाचा टक्का वाढविणे त्या जादूगारांच्या हातात नसल्याचे अनेकदा झालेल्या निवडणुकीवरून दिसून आले आहे.

त्यामुळे पारंपरिक जादूगाराला सादघातली आहे. कारण लोकसभा, विधानसभा किंवा महापालिकेची निवडणूक असू देत, लोक या दिवसाला सुट्टीचा दिवस समजून या दिवशी फिरायला जातात. मतदानाकरिता सुट्टी असतानाही अनेक मतदार मतदानाऐवजी मौजमजेसाठी पर्यटनाला जातात. त्यामुळे मतदानाची टक्केवारी कमी होत असते. हे गेल्या काही वर्षांपासून सतत होत आहे. त्यामुळे प्रशासनही सज्ज झाले आहे. त्यासोबतच सर्वच राजकीय पक्षांसह अपक्षांकडूनही प्रचार जोरात सुरु झालेला आहे. प्रचाराच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. कार्यकर्ते घरोघरी जाऊन, पदयात्रा, मोटारसायकल रॅली काढून मतदारांसोबत संपर्क करण्यासाठी सर्वच डिजिटल मीडियाचाही वापर केला जात आहे. तरी काही नागरिक या सोशल मीडियापासून दूर आहेत. त्यामुळे त्यांनाही मतदानाबद्दल जनजागृती करणे आणि उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी कलाकारांची साथ घेतली जात आहे.

राज्यात येणारे सरकार महाविकास आघाडीचे : दानवे

। आडुळ । वृत्तसंस्था ।

राज्यात परिवर्तन अटळ असून, येणारे सरकार हे महाविकास आघाडीचे असेल. शेतीमालाचे भाव कोसळलेले असून, बेरोजगारी, महिला सुरक्षेसारखे अनेक प्रश्न ऐरणीवर आहेत. राज्याच्या व तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी महाविकास आघाडीला मतदान करा, असे आवाहन विरोध पक्षनेते अंबादास दानवे यांनी शुक्रवारी आडुळ येथे केले.

पैठण विधानसभा क्षेत्रातील महाविकास विकास आघाडीचे उमेदवार दत्ता गोर्डे यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री अनिल पटेल, माजी आमदार संजय वाघचौरे, संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सचिन घायळ, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विनोद तांबे, आनंद भालेकर, शुभम पिवळ यांनी मार्गदर्शन करताना महाविकास आघाडीलाच आपली मते द्या, असे सांगितले.

यावेळी व्यासपीठावर बद्रीनारायण भुमरे, विलास शेळके, भाऊसाहेब पिवळ, विकास गोर्डे, शामबाबा गांवडे, मुरलीआण्णा चौधरी, दत्तुकाका ठोंबरे, प्रल्हाद औटे, नकुल मुळे, राखीताई परदेशी, सिंधुताई पिवळ, सुनिताताई पिवळ, सरपंच बबन भावले, अनिस पटेल, रऊफ पटेल, रसुल पटेल, रावसाहेब अडसुळ, अनिल घोडके, कौसर पटेल, आबासाहेब भुमरे, मुस्तफा पठाण,माजी सरपंच श्रीपाल राठोड, सुनिल पिवळ आदी उपस्थित होते.

विधानसभेसाठी शरद पवार ॲक्शन मोडमध्ये

। बारामती । वृत्तसंस्था ।

विधानसभा निवडणूक आता ऐन रंगात आली आहे. अशावेळी निवडणुकीसाठी सर्वच पक्ष जोरदार तयारीला लागले आहेत. सर्वच पक्षांनी चांगलीच मोर्चेबांधणी केली असून, पक्षांचे प्रमुख नेते प्रचार सभा घेत आहेत. या सभा घेण्याम ध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हेही मागे राहिले नाहीत. ते यंदा निवडणुकीम ध्ये तब्बल पन्नास सभा घेणार आहेत.

महाविकास आघाडी कडूनही मोठा प्रमाणावर प्रचार केला जात आहे. यात शरद पवार स्वतः आघाडीवर असून, महाविकास आघाडीचा नेतृत्व करत असल्याचे पाहायला मिळत आहे. शरद पवार हे संपूर्ण महाराष्ट्रात ५० सभा घेणार आहेत. आज त्यांच्या चार सभा होणार असून, धनंजय मुंडे यांच्या विरोधात परळीत शरद पवार सभा घेणार आहेत. शरद पवार आज बीड जिल्हा दौऱ्यावर आहेत. विरोधकांनीही पवारांच्या सभांचा धसका घेतला आहे.

तब्बल ५० सभांचे आयोजन

मुरबे बंदर प्रकल्पाला ग्रामस्थांचा विरोध

। पालघर । वृत्तसंस्था ।

पालघर विधानसभा मतदारसंघात महायुतीचे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार राजेंद्र गावित यांच्या प्रचार रॅलीला स्थानिक ग्रामस्थांचा विरोध होत असून, सातपाटी व मुरबे येथे रॅलीच्या दरम्यान निषेधाचा सूर उमटल्याचे दिसून आले. केंद्र सरकारने वाढवण आणि मुरबे या भागात प्रस्तावित बंदर उभारणी प्रकल्पाला गती दिली असून, याविरोधात पश्चिम किनारपट्टीवरील गावकरी आक्रमक झाले आहेत. मुरबे येथे प्रस्तावित बंदराच्या विरोधात ग्राम स्थांनी काळे झेंडे दाखवले तर ग्रामपंचायतीच्या वतीने बंदराच्या विरोधात निवेदन देण्यात आले.

राजेंद्र गावित यांच्या प्रचार रॅलीला काळे झेंडे

स्थानिकांनी यापूर्वी वाढवण व मुरबे येथील प्रस्तावित बंदराच्या विरोधात राजेंद्र गावित यांची मुरबे गावात प्रचार रॅली सुरू असताना ग्रामस्थांनी काळे झेंडे दाखवत प्रचार रॅली रोखली. यावेळी राजेंद्र गावित यांनी खासदार असताना या प्रकल्पात विरोधात ठोस भूमिका घेतली नाही म्हणून गावित यांच्यासह महायुतीच्या धोरणांचा निषेध करण्यात आला. ग्रामपंचायत सरपंच मोनालिसा तरे, उपसरपंच राकेश तरे व ग्रामपंचायत सदस्य यांनी मुरबे बंदराला विरोध करणारे निवेदन राजेंद्र गावित यांना सादर केले. राजेंद्र गावित निवडून आल्यास त्यांनी बंदराच्या विरोधात ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या सोबत उभे राहावे, अशी जाहीर अपेक्षा व्यक्त केली. राजेंद्र गावित यांनी खासदार होण्यापूर्वी बंदर प्रकल्पाच्या विरोधात भूमिका घेतली होती, तसेच बंदराचे काम सुरू झाल्यास आपण बुलडोझर समोर झोपू असे जाहीर घोषणा केली होती. मात्र, महायुतीकडून उमेदवारी मिळाल्यानंतर तसेच खासदारकीच्या कारकीर्दीत गावित यांनी या प्रकल्पांविषयी मौन पाळल्याने गावोगावी भेट देत असताना त्यांच्या विरोधात तीव्र पडसाद उमटत आहेत.

लातूर ग्रामीणमध्ये यंदा कार्यकर्ते, मतदारांचा मान-सन्मान

। रेणापूर । वृत्तसंस्था ।

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीकडून काँग्रेसतर्फे आमदार धीरज देशमुख तर महायुतीकडून भाजपचे विधान परिषदेचे आमदार रमेश कराड उमेदवार आहेत. वर्ष २०१९ मध्ये प्रतिस्पर्धी उमेदवारच मतदारसंघात फिरकला नसल्यामुळे काँग्रेससाठी एकतर्फी निवडणूक झाली होती. मात्र, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत तुल्यबळ लढत होत आहे. परिणामी ग्रामीण भागातील कार्यकर्ते, मतदार यांना मान-सन्मान मिळत असल्याने निवडणुकीत रंगत येत आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात संपूर्ण रेणापूर तालुक्याचा समावेश आहे. याशिवाय लातूर तालुक्यातील बहुतांश गावे व औसा तालुक्यातील भादा सर्कलमधील गावांचा समावेश आहे. वर्ष २०१९ च्या निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदारसंघ युतीकडून ऐनवेळी शिवसेनेला सुटला. त्यानंतर शिवसेनेने दिलेला उमेदवार प्रचारासही फिरकला नव्हता, त्यामुळे धीरज देशमुख यांचा एकतर्फी विजय झाला.

यानंतर भाजपने २०२० मध्ये रमेश कराड यांना विधानपरिषदेवर संधी दिली. यामुळे मतदारसंघात दोन आमदार झाले. बघता बघता ५ वर्षे निघून गेली. कामाच्या श्रेयवादावरून आमदारांकडून पत्रकबाजी करण्यात आली. यात ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता मात्र विकास नेम का कोणी केला याचा विचार करत बसली. काँग्रेस अडीच वर्षे तर भाजप अडीच वर्ष सत्तेत राहिली. यात म तदारसंघात कुठल्या आमदाराने किती निधी आणला,यावरच मतदारसंघात सध्या चर्चा सुरू आहे.

२ लाख ४० हजार मतदारांना स्मार्टकार्ड

जिल्हा निवडणूक शाखेतर्फे वितरण सुरू

। नाशिक । वृत्तसंस्था ।

विधानसभा निवडणुकीत मतदानासाठी अवघे दहा दिवस राहिलेले असल्याने मतदारांपर्यंत स्मार्ट कार्ड (ई-पीक) पोहोचविण्याची लगीनघाई सुरू झाली आहे. ६ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२४ या साधारणत: तीन महिन्यांच्या काळात नोंदणी केलेल्या दोन लाख ४० हजार मतदारांना स्मार्टकार्ड मिळणार आहेत. त्यांपैकी ५९ हजार कार्डची निवडणूक शाखेला प्रतीक्षा लागून आहे. विधानसभेसाठी येत्या २० तारखेला मतदान होणार आहे.

जिल्ह्यातील १५ विधानसभा मतदारसंघांतील चार हजार ९२२ मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण ५० लाख ६१ हजार म तदारांची नोंद झाली. ४ जून २०२४ ला लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर ६ जूनपासून नवीन मतदार नोंदणी सुरू झाली. लोकसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यात ४८ लाख ३८ हजार मतदारांची नोंदणी झाली होती. मतदार नोंदणी अभियान जोमाने राबविण्यात आल्यानंतर ऑगस्ट ते ऑक्टोबर या तीन महिन्यांत जिल्ह्यात दोन लाख ४० हजारांवर मतदारांची वाढ झाली. यात सर्वाधिक मतदार मालेगाव मध्य येथे ३८ हजार २७९ इतके झाले. सर्वांत कमी मतदार नोंदणी इगतपुरीत चार हजार ८५७ इतकी झाली आहे. पोस्टाद्वारे घरपोच ओळखपत्रे नवीन नोंदणी केलेल्या मतदारांना पोस्टाद्वारे घरपोच ओळखपत्र पाठविले जात आहे. आतापर्यंत एक लाख ८० हजार मतदारांचे कार्ड संबंधित निवडणूक शाखेकडे प्राप्त झाली आहेत. उर्वरित ५९ हजार कार्डची प्रतीक्षा असून, त्यांना येत्या दहा दिवसांच्या आत कार्ड पोहोचविण्याचे प्रमुख आव्हान निवडणूक विभागासमोर राहील. दरम्यान, मतदान कार्ड नसेल आणि मतदारयादीत नाव असल्यास संबंधित मतदाराला १२ पैकी एक पुरावा दाखवून मतदान करता येईल.

मतदानासाठी ओळखपत्र आवश्यक असणे गरजेचे नाही. मात्र, मतदाराचे नाव मतदारयादीत समाविष्ट असणे गरजेचे आहे. त्यासाठी मतदारयाद्या नूतनीकरण करतात, तेव्हा १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर नाव नोंदण्याची आवश्यकता असते.

यापैकी एक कागदपत्रही चालेल

आधारकार्ड, पॅनकार्ड, पेन्शन कार्ड, युनिक डिसॲबिलिटी आयडी यूडीआयडी, सर्व्हिस आयडी कार्ड, पोस्ट ऑफिस किंवा बँकेचे पासबुक, श्रम मंत्रालयाचे हेल्थ इंश्युरन्स स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टरचे आरजीआय स्मार्टकार्ड, आमदार, खासदार यांचे ऑफिशिअल आयडी कार्ड, मनरेगा कार्ड.

रेवदंड्यात महाविकास आघाडीचा प्रचार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचाराचा धडाका रेवदंड्यात लावला आहे. रेवदंड्याचे ग्रामदैवत मारुती देवस्थानचे दर्शन घेऊन प्रचाराचा शुभारंभ शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि.०९) करण्यात आला. दरम्यान निवडणुकीचे चिन्ह शिट्टी वाजवत आणि घोषणा देत प्रचार सुरु करण्यात आला. मतदारांपर्यंत चिन्ह पोहचविण्याचे काम यावेळी कार्यकर्त्यांनी केले.

यावेळी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, काँग्रेस चौल विभागीय अध्यक्ष अशोक आंबुकर, रेवदंडा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सदाशिव मोरे, सोनाली मोरे, सदस्य संतोष मोरे, राजेंद्र वाडकर, सुरेश खोत, निलेश खोत, राजेंद्र चुनेकर, हेमंत गणपत, प्रमोद नवखारकर विभाग प्रमुख मारुती भगत, चौल उपसरपंच अजित गुरव, सदस्य जयवंत ठोंबरे पदाधिकारी काँग्रेसचे विभागीय खजिनदार सुगम आंबुकर, आशिष गोंधळी, सदस्य गोंधळी, नवाब तांडेल, संगीता महिमकर आदी शेकाप, काँग्रेस व शिवसेनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी अवघे बारा दिवस उरले आहेत. प्रचाराचा वेग वाढू लागला आहे. मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागले आहेत. बैठकांच्या माध्यमातून कार्यकर्ते व मतदारांपर्यंत पोहचण्याचे काम केले जात आहे.

शेकाप नेते जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती

महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्यासह महाविकास आघाडीचे असंख्य कार्यकर्ते प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. चित्रलेखा पाटील यांना मतदारांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून त्यांचे जल्लोषात स्वागत केले जात आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांसह मतदारांकडून त्यांचा वाढता प्रतिसाद यातून दिसून येत आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांना निवडून देण्यासाठी ठाकरे गटातील जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, काँग्रेसचे विभागीय अध्यक्ष अशोक आंबुकर व इतर घटक पक्षांचे नेते प्रचंड मेहनत घेत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

काँग्रेसच्या पाठिंब्यामुळे मविआ मजबूत

श्रीवर्धन : श्रीवर्धन विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यात सरळ लढत होत आहे. यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल नवगणे यांना काँग्रेसने जाहीर पाठींबा दिल्याने आघाडी अधिक मजबूत झाल्याचे मत अनिल नवगणे यांनी कृषीवल सोबत बोलताना व्यक्त केले आहे.

गेल्या आठवड्यात श्रीवर्धन, माणगाव, म्हसळा, तळा आणि रोहा तालुका काँग्रेस अध्यक्ष आणि जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष, महिला उपाध्यक्ष आणि काँग्रेस कार्यकर्ते यांनी म्हसळा येथे अपक्ष उमेदवार राजा ठाकूर यांचे काम करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, आता काँग्रेसचा अनिल नवगणे यांना जाहीर पाठिंबा जाहीर केल्याने श्रीवर्धन मतदार संघातील मविआच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढला आहे. यावेळी अनिल नवगणे यांनी सांगितले की, गेली २० ते २५ वर्षे या मतदार संघाशी चांगला संपर्क असून मुंबई मंडळाशीही जिव्हाळ्याचे संबंध आहेत. आता काँग्रेसने देखील पाठींबा जाहिर केल्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत माझा विजय निश्चित होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर लाखांची रोख रक्कम जप्त

पनवेल : विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. अशातच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे व त्यांच्या पथकाला कामोठेकडे जाणारी संशयास्पद दुचाकी दिसली. ती दुचाकी अडवून तपासणी केली असता त्या गाडीमध्ये ५ लाख ८५ हजाराची रोख रक्कम आढळून आली. ही रक्कम व संबंधितांना ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीसाठी भरारी पथकाकडे सुपूर्द करण्यात आली. तसेच, दुसऱ्या घटनेत आचारसंहिता पथकांतर्गत वायूवेग पथकाने मोटार वाहन निरिक्षक दिलिप दराडे यांना मुंबई-पुणे महामार्गावरून कळंबोलीकडे जाणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या संक्षयास्पद चारचाकी दिसली. यामुळे त्यांनी संबंधीत गाडी अडवून गाडीची तपासणी केली असता या गाडीमध्ये २ लाखाची रोख रक्कम आढळून आली असून ही रक्कम जप्त करण्यात आली. तसेच, तिसऱ्या घटनेत आचारसंहिता पथकांतर्गत स्थिरसर्वेक्षण पथकाने जुने मुंबई-पुणे महामार्गावरील शेडुंग चेक नाका येथून जाणाऱ्या चारचाकी गाडीला थांबवून तपासणी केधली असता त्या गाडीमध्ये १ लाख ९२ हजार २० रुपयांची रोख रक्कम आढळून आली. या पथकाने ती रक्कम जप्त केली असून संबधितांवर कारवाई करण्यात आली आहे.

पनवेलमध्ये बेकायदा मद्यविक्रेत्यांवर कारवाई

पनवेल : अगामी निवडणुकीच्या काळात दारुची मोठ्या प्रमाणात अवैध विक्री केली जात आहे. दारुच्या अवैध विक्रीला आळा घालण्यासाठी नवी मुंबइ पोलिसांकडून सातत्याने कारवाया सुरु आहेत. अतापर्यंत नवी मुंबई पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापे मारुन दारु विक्रेत्यांवर तसेच गावठी हातभट्टीची दारु गाळणाऱ्यांवर एकूण १२७ कारवाया केल्या आहेत. या कारवाईत पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापेमारी करुन ८ लाख १९ हजार रुपये किंमतीची २ हजार ४७०.०९ लिटर दारु जप्त केली आहे. याचप्रमाणे गुटखा आणि पानमसाला विक्री तसेच वाहतूक करणाऱ्यांविरोधात १० कारवाया करुन १० लाख २५ हजार २१९ रुपये किंमतीचे १० हजार ६० गुटख्याचे पाऊच जप्त केले आहेत. याशिवाय पोलिसांनी या कारवायांमध्ये एक चारचाकी आणि २ दुचाकी वाहने तसेच दारु बनविण्यासाठी लागणारे साहित्य, रोख रक्कम, ४२ मोबाईल फोन आणि १ लॅपटॉप सुध्दा जप्त केला आहे.

युवाशक्ती प्रीतम म्हात्रे यांच्या पाठीशी

। उरण । प्रतिनिधी ।

उरण विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेतृत्व प्रीतम म्हात्रे यांना उरण तालुक्यातील चाणजे, नवघर, जासई व कोप्रोली या चारही मतदारसंघातून प्रचंड बहुमत मिळणार आहे. यासाठी या परिसरातील तरुणांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. यावेळी उरण तालुक्यातील तरुण सक्रिय झाले असून, आता आम्हाला आमच्या हक्काचा तसेच भूमिपुत्रांना न्याय देणारा प्रीतम म्हात्रे यांच्या रूपाने आमदार हवा असल्याच्या प्रतिक्रिया तरुणांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

उरण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या गटातील अनेक गावांतून तरुण आणि युवा मतदार उत्स्फूर्तपणे बाहेर पडू लागला आहे. यामुळे संपूर्ण तालुक्यातील चित्र बदलल आहे. समाजात सर्वसामान्य नागरिकांना सर्वतोपरी सदैव सहकार्य करण्यासाठी तत्पर असलेले प्रीतम म्हात्रे यांच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याने भारावून शेकडो तरुण गावोगावातील प्रचारात सक्रिय झाले आहेत. आजपर्यंत त्यांनी वैयक्तिक ५० हजार पेक्षा जास्त कुटुंबाला रोजगार दिला आहे. या उलट विरोधकांनी आतापर्यंत नुसती आश्वासने दिली आहेत. यासाठी संपूर्ण युवाशक्ती प्रीतम म्हात्रे यांच्या पाठीमागे असून त्यांचे काम तळागाळात पोहोचविण्यासाठी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरली आहे.

आम आदमी पार्टीचा पाठिंबा

शेतकरी कामगार पक्षाचे उरण विधानसभेचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांना आम आदमी पार्टीने बिनशर्त पाठिंबा दिला असल्याचे पत्र महाराष्ट्र राज्याचे प्रदेश संघटन मंत्री यांनी दिले आहे. यावेळी शेकाप कार्यकर्त्यांसह आपच्या कार्यकर्ते देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच, प्रीतम म्हात्रे यांना विविध पक्ष, संघटना आणि संस्थाचा पाठिंबा मिळत असून उरण मतदार संघातील त्यांची ताकद वाढली आहे.

उरणमध्ये प्रीतम म्हात्रेंचीच हवा

उरण : सिडकोच्या माध्यमातून उरण वेगाने विकसित होत असताना योग्य प्रशिक्षणाअभावी तरूणाच्या हाताला काम मिळत नसल्याने भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. या तरूणाचे भविष्य उध्वस्त होवू नये यासाठी प्रीतम म्हात्रे यांनी जे.एम. म्हात्रे ट्रस्टच्या माध्यमातून युवकांना प्रशिक्षीत करण्याचे काम हाती घेतले आहे. गेल्या काही महिन्याच्या परिश्रमानंतर येथून प्रशिक्षण घेतलेल्या ४४ तरूण तरूणींना विमानातील नोकऱ्या मिळाल्याने तरूणाईत आशादायी वातावरण निर्माण झाली असून प्रीतम म्हात्रे यांच्या पाठीशी एकवटली आहे. या तरूण वर्गाने विधानसभा निवडणूक प्रचारासाठी उरण तालुक्याचा दौरा केला. यावेळी तरूणाईने एकच जल्लोष करून प्रीतम म्हात्रे यांच्या अभूतपुर्व कार्याची पोहोचपावती दिली आहे.

यावेळी शेकापक्षाचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, नारायण घरत, पाडूमामा घरत, अनिल ढवले, रमाकांत घरत, जितेंद्र घरत, सचीन ताटफले व माधव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

बाळाराम पाटील यांना चांगला प्रतिसाद

। पनवेल । वार्ताहर ।

महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शेतकरी कामगार पक्षाकडून पनवेल विधानसभा निवडणूक लढवत असलेले बाळाराम पाटील यांच्यावर अन्याय झाल्याची भावना सर्वसामान्य कार्यकर्त्यांनमध्ये निर्माण झाली आहे. याच भावनेतून कार्यकर्ते बाळाराम पाटील यांच्या निवडणूक चिन्ह असलेली शिट्टी घरोघरी पोहचवण्यासाठी मेहनत घेत आहे. यामुळे अल्पावधीतच शिट्टी हे चिन्ह घरोघरी पोहचवण्यात शेकाप कार्यकर्त्यांना यश आलेले आहे. दरम्यान, सर्वसामान्यानांचा नेता म्हणून ओळख निर्माण केलेल्या बाळाराम पाटील यांना मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मविआतील घटक पक्ष असलेल्या शेकापने नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या उमेदवाराला चांगली साथ दिली होती. याच साथीच्या जोरावर मविआतून मशाल या चिन्हावर मावळ लोकसभेची निवडणूक लढवलेल्या संजोग वाघेरे यांना उरण आणि कर्जत मतदार संघातून आघाडी मिळाली होती. तर, पनवेल विधानसभा मतदार संघात देखील चांगली मते मिळाली होती. यामुळे पनवेल आणि उरण मधील विधानसभेच्या जागा शेकापला मिळतील अशी अपेक्षा सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये होती. मात्र, तसे न झाल्याने शेकाप आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने स्वतंत्र्यपणे उमेदवार उतरवण्याचा निर्णय घेतला होता. असे असले तरी आघाडीतील प्रमुख पक्ष असलेले राष्ट्रवादी (शरद पवार), काँग्रेस, समाजवादी पार्टी, आम आदमी पार्टी तसेच स्वतंत्र पणे उमेदवारी दिलेल्या शिवसेना (उद्धव ठाकरे) गटातील कार्यकर्ते बाळाराम पाटील यांचा प्रचार करत आहेत.

रोजगार मिळण्यासाठी संधी द्या

प्रीतम म्हात्रे यांचे प्रतिपादन

। उरण । प्रतिनिधी ।

उरण विधानसभा मतदार संघ हा शेकापचा बालेकिल्ला आहे आणि भविष्यातही तो तसाच राहिल. मात्र, आपल्या चुकीच्या निर्णयामुळे या मतदार संघाचा विकास रखडला असून येथील तरूणांच्या रोजगाराचाही प्रश्न उद्‌भवला आहे. हे दुष्टचक्र थांबवून तरूणाच्या हाताला काम देण्यासाठी आपल्याला संधी द्यावी, तसे झाल्यास तुमचा विश्वास सार्थ ठरविल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपाटदन शेकाप उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी केले आहे.

उरण विधानसभा निवडणूकीच्या निमीत्ताने प्रीतम म्हात्रे यांनी तालुक्यातील गव्हाण, कोपर, न्हावा, बामणडोगरी, मोहो, वहाल, उलवे, पळस्पे, कोन असणि कोलखा आदी गावाचा दौरा केला. यावेळी गव्हाण येथे प्रचाराची जाहिर सभा घेण्यात आली यावेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, ही भुमी आंदोलकांची आहे. या तालुक्याने आजवर आपले हक्क लढून मिळवले आहेत. गेल्या पाच वर्षात येथील लोकप्रतिनिधींनी विकासाचे एकही काम न करता केवळ थापाच मारल्या आहेत. येथे तरूणाईच्या हाताला काम राहिले नाही. युवकांना भेडसावणारी रोजगाराची समस्या सोडवण्यासाठी आपण प्रयत्नशिल असून शेकापक्ष व जे.एम. म्हात्रे ट्रस्टच्या माध्यमातून आपण युवकाना मोफत प्रशिक्षण देत असल्याचे त्यांनी सांगितले.

विश्वास पेटकर यांचा राजीनामा

बाळाराम पाटील यांना मदतीचा हात

। पनवेल । प्रतिनिधी ।

दोन वर्षापूर्वी पनवेल तालुका प्रमुखपदी विश्वास पेटकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु, पनवेल मतदार संघातून मविआचे दोन उमेदवार उभे असून पेटकर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना पनवेल विधानसभेचे शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील यांना मदत करायची असल्यामुळे त्यांनी तालुका प्रमुख पदाचा राजीनामा दिला आहे.

शेतकरी कामगार पक्षाने पनवेलमध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती व पनवेल अर्बन बँकेतील सत्तेत शिवसेनेला सहभागी करुन घेतले आहे. तसेच, मा. आ. बाळाराम पाटील यांनी पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी, प्रकल्पग्रस्तांसाठी तसेच स्थानिकांसाठी आणि महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांसाठी वेगवेगळी जनआंदोलने उभी करून न्याय मिळवून दिला आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना निवडून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर त्यांनी प्रयत्न केले होते. याची परतफेड करण्यासाठी व मा.आ. बाळाराम पाटील यांना निवडून आणण्यासाठी शिवसेना (उद्धव ठाकरे) तालुका प्रमुख विश्वास जगन्नाथ पेटकर यांनी पदाचा राजीनामा दिला आहे.

● महाविकास आघाडी पुरस्कृत शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचाराचा नारळ शनिवारी खंडाळे येथे फोडण्यात आला. रायगड माजी जि.प.सदस्य संजय पाटील, एस.एम. पाटील यांच्या प्रमुख उपस्थित प्रचाराचा शुभारंभ पार पडला.

अलिबागेत प्रचाराचा झंझावात

● अलिबाग-मुरूड आणि रोहा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचा अलिबाग तालुक्यातील रेवस, कावाडे, सारळ, नवखार आणि हाशिवरे आदी ठिकाणी शुक्रवारी (दि.८) प्रचार दौरा पार पडला.

● महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचा अलिबाग कोळीवाड्यासह रामनाथ आणि चेंढरे येथे प्रचार करण्यात आला. माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, काँग्रेसचे राज्य सचिव ॲड. प्रविण ठाकूर, शेकापचे युवा नेते युवराज पाटील आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

महायुतीच्या उमेदवाराची 'सेफ्टी' धोक्यात

● नौदलाच्या सेफ्टी झोनचे आरक्षण मानगुटीवर ● सत्ताधाऱ्यांकडून आरक्षणाचा प्रश्न सोडविण्याकडे दुर्लक्ष

। चिरनेर । प्रतिनिधी ।
उरणकरांच्या जीवनमरणाशी निगडीत असलेल्या केंद्र सरकारच्या अखत्यारीतील अनेक समस्या सोडवण्यात केंद्र व राज्य सरकार अपयशीच ठरले आहे. याचा जोरदार फटका विधानसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांनाच अधिक बसण्याची शक्यता आहे.



उरण शहर व ग्रामीण भागातील म्हातवली, केगाव, बोरी, हनुमान कोळीवाडा, मोरा, भवरा आदी भागात नौदलाने सेफ्टी झोनचे आरक्षण टाकले आहे. या सेफ्टी झोनच्या आरक्षणात शासकीय विभागाच्या अनेक कार्यालयासह २५ हजार कुटुंबे बाधित आहेत. या सेफ्टीझोन परिसरात सुमारे ५० हजार रहिवासी वास्तव्य करून आहेत. विशेष म्हणजे, नौदलाच्या सेफ्टी झोनच्या १९९२ साली टाकलेल्या आरक्षणापूर्वीची घरे आहेत. स्वतःच्याच मालकीच्या व स्वतःच बांधलेली घरे आता सेफ्टी झोनच्या आरक्षणाखाली आलेली आहेत. त्यामुळे ना घरांचे पुनर्विकास करता येत, ना जमिनीची विक्री करता येत. त्यामुळे नौदलाच्या आरक्षणाचे भूत ५० हजार रहिवाशांच्या मानगुटीवर बसलेले आहे. केंद्राच्या अखत्यारीत असलेल्या या प्रश्नावर न्यायालयात आणि केंद्र, राज्य सरकारशी संघर्ष सुरू आहे. अनेक वर्षांपासून हजारो रहिवाशांच्या जीवनमरणाशी निगडित असलेला प्रश्न सत्ताधाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षितपणामुळे अद्यापही सुटलेला नाही. नौदलाची जुनी दगडाची ब्रेक वॉटर जेट्टी मोरा बंदरात गाळ साचण्यासाठी कारणीभूत ठरतेय. त्याकडेही दुर्लक्षच केले जात आहे.

केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या जेएनपीएने बंदर आणि ओएनजीसीने तेल व नैसर्गिक वायूनिर्मिती करण्याचा प्रकल्प उभारण्यासाठी शेतकऱ्यांच्या हजारो हेक्टर जमीन सिडकोच्या माध्यमातून कवडीमोल भावाने संपादन करण्यात आलेल्या आहेत. जमिनी संपादन करण्यासाठी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोकऱ्या, रोजगार देण्याची हमी देण्यात आली होती. मात्र, दिलेल्या आश्वासनांना हरताळ फासून ओएनजीसी, जेएनपीए स्थानिकांना डावलून परप्रांतीय कामगारांची भरती केली जात आहे. उरण परिसरात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झाले आहे. मात्र, रोजगारांची संख्या कमी न होता वाढतच चालली आहे.

उरण परिसरात ओएनजीसी, जेएनपीएच्या रासायनिक प्रकल्पांमुळे जल व वायू प्रदूषणाची समस्या निर्माण झाली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या वाढत्या प्रदूषणाविरोधात विविध ग्रामपंचायतींसह नागरिकांनीही तक्रारी केल्या आहेत. मात्र, त्याकडे लक्ष देण्यासाठी ना शासनाकडे, ना लोकप्रतिनिधींकडे वेळ. दुर्लक्षामुळे मात्र उरण परिसरातील नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरू आहे.

जेएनपीए विस्थापित वाळवीग्रस्त हनुमान कोळीवाडा पुनर्वसनाचा प्रश्न मागील ३८ वर्षांपासून प्रलंबित आहे. चर्चा, बैठका, आंदोलने आणि संघर्षानंतरही प्रश्न अद्यापही सुटलेले नाही. जेएनपीए साडेबारा टक्के भूखंडाचा प्रश्नही निकाली निघालेला नाही.

उरणकरांचे केंद्र सरकारच्या अखत्यारीतील विविध प्रश्न सोडविण्यात, पाठपुरावा करण्यात सत्ताधारी अपयशीच ठरले आहेत. यामुळे उरणकरांचे प्रश्न मात्र कायम राहिले आहेत.त्यामुळे मतदारसंघात नाराजी पसरली आहे. त्याचे विपरीत परिणाम विधानसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांनाच भोगावे लागणार आहेत.

झुडपात हरवला दिशादर्शक फलक

। कोर्लई । वार्ताहर ।

अलिबाग-मुरुड रस्त्यावर कोर्लई स्टॉपनजीकच्या वळणावरील रस्त्यालगत असलेल्या दिशादर्शक फलकाला झाडाझुडपांचा विळखा असून, याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या असलेल्या दुर्लक्षाबाबत वाहनचालकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून कोर्लई स्टॉपनजीकच्या वळणावरील रस्त्यालगत असलेला हा दर्शक फलक संपूर्णपणे वेली झुडपांमुळे झाकलेला असल्याने मुरुड जंजिरा पर्यटनात ये-जा करणाऱ्या पर्यटकांना, वाहन चालकांना रात्री-अपरात्री या वळणावर फलक दिसत नसल्याने वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारीवर्गाने यात लक्ष पुरवून याठिकाणी योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी पर्यटक व वाहनचालकांकडून केली जात आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

विठ्ठल-रखुमाई उत्सवाचे आयोजन

अलिबाग : तालुक्यातील पाल्हे येथील ग्रामस्थ मंडळ व वनदेव क्रीडा मंडळ, जयभवानी मित्रमंडळ आणि सुशांती महिला मंडळाच्या वतीने कार्तिकी एकादशीनिमित्त विठ्ठल-रखुमाई उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाचे औचित्य साधत मंगळवारी (दि.१२) सकाळपासून धार्मिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. सायंकाळी सात वाजता विठ्ठल-रखुमाईची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री दहा वाजता वांद्रे-मुंबई येथील श्री गुरुदत्त प्रासादिक भजन मंडळ आणि कांदिवली-मुंबई येथील गावदेवी प्रासादिक भजन मंडळचे भजन होणार आहे. गणेश जांभळे व उमेश वंजारे भजनाचे बुवा आहेत. यानिमित्ताने सकाळी नऊ ते सायं. सहा यावेळेत कबड्डीचे सामने होणार आहेत. निमंत्रित ३२ संघांचा सहभाग असणार आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील तसेच ग्रुप ग्रामपंचायत वेणगाव यांचे दप्तरी मालमत्ता कमांक १०८३ अशी नोंद असलेली घर मिळकत. सदर घर मिळकत हि असेसमेंट सदरी विट सिमेंट पत्राचे बांधकाम असून त्या घर मिळकतीचे क्षेत्र १६X१८=२८८ चौ. फूट इतके आहे. हि घर मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन अरुण सदू आंब्रे विकत घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर घर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०९-११-२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. नं. ९४२२०६८७५५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. दीपक प्रकाश जुमानी व २. श्री. राजा भगवानदास जुमानी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याबाबत आमचे अशिलांच्या वाटाघाटी चालू आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे	स. नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
वरसोली	१६६/१९०/१९६/१९७ /१९८/१०३	०-०४-८०	४८.००
		(४८० चौ.मीटर)	

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १०/११/२०२४

सही/-
ॲड. माधवी नारायण ठाकूर
सी/३०१, क्लिफ हेवन हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडिया जवळ, कोर्ट रोड,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील तसेच ग्रुप ग्रामपंचायत वेणगाव यांचे दप्तरी मालमत्ता कमांक १०८३ अशी नोंद असलेली घर मिळकत. सदर घर मिळकत हि असेसमेंट सदरी विट सिमेंट पत्राचे बांधकाम असून त्या घर मिळकतीचे क्षेत्र १६X१८=२८८ चौ. फूट इतके आहे. हि घर मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन अरुण सदू आंब्रे विकत घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर घर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०९-११-२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. नं. ९४२२०६८७५५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मी खालील वर्णनाची मिळकत जमीन सदर जमीनीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी घेण्याची ठरविलेली आहे. सदरहु जमीन ही सदर जमीनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटींस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद त्यांचे नांवे आहे त्या मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे कोंदिवडे, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील मिळकत.

जमीन मालकाचे नांव	गावाचे नांव	सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु. पै.
१) मणिकुमार आंबाडी	कोंदिवडे	४	४अ	०-४५-००	१-४४
२) विनीता मणिकुमार आंबाडी रा. ब्लॉक नं.१०५/१०६, प्लॉट नं.बी ११५ सेक्टर नं. ८, वाशी नवी मुंबई		४	८	०-०५-८०	०-२७
		४	१क	०-१०-००	०-२८

तरी वरील प्रमाणे मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकरार, ताबा, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षिस भाडेपट्टा, बोजा, जप्ती कुळवहिवाट, इजमेंट, चार्ज, मृत्युपत्रांकित, दान, लिज, लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असलेस संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आंत खालील लिहिलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून त्यासंबधी कोणाचेही हक्क हितसंबध नाहीत असे गृहित धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करु मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली.

दिनांक : ०८/११/२०२४

श्री. बिरेंद्र यादव
रा-ए-१२०२, श्रीजी हाईटस सेक्टर-४६
ए सीवूड्स नेरूळ नवी मुंबई - ४०००७०६
मोबाईल नंबर - ९३२१५९५४५५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. लक्ष्मण वामन पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे	गट नं./हि. नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु. पै.)
मुशेत	५३/२	०-४०-००	७.२०

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अथिनांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १०/११/२०२४

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०१ २०१.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे ममदापूर ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मालकाचे नांव	सर्व्हे नं.	हि.नं.	क्षेत्र. हे.आर.पॉ	आकार रू. पै.
आसिफ मुश्ताक पौजेंकर व ३	१/४/अ	-	०-०३-०० या पैकी ०-०२-००	०=१४

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- नेरळ
दिनांक :- १०/११/२०२४

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं. १०१, नेरळ ता. कर्जत जि. रायगड
मो. ९८८१२७९८१७

जाहीर नोटीस

जाहीर सुचना देण्यात येते की, आज रोजी खाली नमूद बिनशेती मिळकत श्री. धर्मपाल ओमकारमल चौधरी, सज्ञान भारतीय नागरिक राहणार : वार्ड नं. ०३४, टांडी की ढाणी, टोडी, मनोहरपुर, जयपुर, राजस्थान ३०३१०४ यांच्या खुद्दमालकी हक्कातील, ताबेकब्जातील व वहीवाटीतील बिनशेत जमिन मिळकत असून त्या बिनशेत जमिन मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे:-

जमीन मिळकतीचे वर्णन
मौजे रीस, ता. खालापुर, जि. रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा क्र.	क्षेत्र (आर.चौ.मी.)	आकार (रू.पैसे)
१२७	६/अ/११	४-८९-००	४८.९०

तरीही वर उल्लेखित बिनशेती मिळकतीसंदर्भात टायटल सर्टिफिकेट आणि सर्च रिपोर्ट घेणेबाबत आमचे अशिल श्री. धर्मपाल ओमकारमल चौधरी, यांनी आम्हाला विनंती केली असल्याने आम्ही त्यास मान्यता दिलेली आहे.

परंतु तत्पूर्वी सदर मिळकतीसंदर्भात जर कोणाही व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर मिळकतीवर अथवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, लिन भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/ हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत सादर करावे आणि जर तसे केले नाही तर सदर मिळकत हे सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनांपासून मुक्त आहे, असे गृहित धरुन आम्ही आमच्या अशिलांना सदर मिळकत ही चोख व मार्केटबल आहे, असे टायटल सर्टिफिकेट देवू. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

सही- **ॲड.अभिमन्यू जाधव**
पत्ता- अपार्टमेंट क्र. पीएल- ६ए-४-३
खांदेश्वर अपार्टमेंट, सेक्टर ०१, खांदा कॉलनी,
न्यु पनवेल (प.), ता. पनवेल, जि. रायगड
दिनांक- ०९/११/२०२४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक १) अमोल जगदीश कपाडीया, २) अझीम फैजुल्लाह तापीया, ३) जावेद फैजुल्लाह तापीया व ४) दिपेश जगदीश कपाडीया यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं./हि. नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु. पै.)
१) मुशेत	५१/२/१	०-६६-८०	१५.७५
		०-०६-२०	
		०-७३-००	
		पो.ख. ०-१२-५०	
		०-०१-९०	
		०-८७-४०	
२) मुशेत	५४	०-६८-६०	१२.८८
		पो.ख. ०-०६-३०	
		०-७४-९०	

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १०/११/२०२४

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
अे/१, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०१ २०१.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मिळकतीचे वर्णन :
मौजे उक्रुळ, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रुपये	आकार पैसे
श्री. प्रविण कुमार मित्तल	७४	४	०-६०-२०	९	८१

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-ए विंग, फ्लॅट नं.४, चौथा मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.

सही / -
ॲड. जयेश संभाजी म्हसे
दिनांक:-१०/११/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल:-..adv.jayeshmhase@gmail.com

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

मौजे महागाव, ता.सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकती.
मिळकतीचे वर्णन :-

जमिन मालकाची नांवे	गट/स.नं.	क्षेत्र हे.आर./ आर.चौ.मी.	आकार रु.पैसे
मे. पॅराडाईज ऑम्यूजमेंट प्रा.लि. संचालक सुरेंद्र महादेव तावडे	५९८	३-५८-००	०-७५
	६०९	४-९७-००	०-७५
श्रीम. शिवानीकुमारी विक्की सावंत	६०७	१-२०-००	०-३४
	६०८	१-२३-००	०-३४
श्री. मधुकर दत्तू नाईक	६१०	३-५८-००	१-५०
श्रीम.लता बाबुराव पेडणेकर	५९९	२४३.००.००	२४३०.००
सुरेंद्र महादेव तावडे संचालक पॅराडाईज ऑम्यूजमेंट प्रा. लि.	६००	२४२.००.००	२४२०.००

तरी वरील मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १०/११/२०२४

खरेदीदारांचे लेखक,
राठोड एण्ड एसोसिएट्स
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं.८ पाली, ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद.
गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या,
हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

■ शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नोंदणी. ५० शाखा-वेबसाईट नोंदणीसाठी-९२२६७६६१२९,९३७०५१७९४९

■ weight loss by 6 Natural Therapies (No madicine-No Exercise-No suppliment) wellness clinic-9226766129

■ अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९ व

पान १ वरून

चिऊताईंचा आज प्रचार दौरा

त्यानंतर उसर येथील रामदास शिंदे यांच्या निवासस्थानी सायंकाळी पाच वाजता,बामणगावमधील नरेंद्र उले यांच्या निवासस्थानी सायंकाळी सहा वाजता, बोरपाडामधील दिपक ठाकूर यांच्या निवासस्थानी सायंकाळी सात वाजता, तसेच सहाणमधील प्रल्हाद साळावकर यांच्या निवासस्थानी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास प्रचार होणार आहे. दरम्यान, या कार्यकर्त्यांना भेटून त्यांच्याशी चित्रलेखा पाटील संवाद साधणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

मतदानासाठी ओळखपत्र पुरावे ग्राह्य

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र, निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे. एखाद्या मतदाराने मतदार यादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्त्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान दिनांकाच्या किमान पाच दिवस आधी मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण केले जाईल. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती-चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्रासोबत घेऊन यावे, असे आवाहन जावळे यांनी केले आहे.

मृत्यूनंतरही यातना संपेना!

रुग्णवाहिका अथवा खासगी वाहन उपलब्ध झाली नाही. अखेरीस ग्रामस्थांनी झोळी करून मृतदेह खवसावाडीत नेला. याबाबत आदिवासी समाजात संताप व्यक्त होत आहे. या वाडीपर्यंत रस्ता करण्यासाठी दहा महिन्यांपूर्वी ७ कोटी ६० लाखांचे काम ठेकेदाराला देण्यात आले आहे. मात्र, त्याकडे ठेकेदाराने साफ दुर्लक्ष केले. या ठेकेदाराला अधिकाऱ्यांचे अभय असल्याने ठेकेदार काम करीत नसावा, अशी चर्चा आहे.

अधिकारी आले चोरपावलांनी

अधिकारी रवी पोचपोर, उपकार्यकारी अभियंता मनिषा शिद आदींनी चोरपावलांनी खवसावाडी गाठली. मात्र, त्या ठिकाणी ही एका आदिवासी गरोदर महिलेने अधिकाऱ्यांची चांगलीच उजळणी घेतली. मात्र, कामात कामचुकारपणा केल्याने त्यांची बोलती बंद होती.

हा रस्ता जिल्हा परिषदेच्या अखत्यारित नसून, पंतप्रधान ग्रामसडक अंतर्गत आहे.तसेच सिद्धीविनायक कन्स्ट्रक्शन या नावाचा ठेकेदार कोण आहे हे मला माहीत नाही. याबाबत माहिती घेण्यात येईल, असे कार्यकारी अभियंता राहुले देवांग यांनी सांगितले.गेल्या दोन वर्षांपासून येथील खवसावाडी, काजूचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पाचही आदिवासी वाड्यांच्या मूलभूत सुविधांसाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. सिध्दिविनायक कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराने दहा महिने उलटूनही या रस्त्याचे काम सुरू केलेले नाही. आज या आदिवासी वाड्यांची रस्त्याविना दयनिय अवस्था आहे. काल जो प्रकार झाला, तो फक्त आणि फक्त राजकीय उदासीनतेचे एक उदाहरण आहे. ठेकेदारच्या मागे राजकीय वरदहस्त असल्याशिवाय ठेकेदार मनमानी करु शकत नाही, असे ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था अध्यक्ष, संतोष ठाकूर यांनी सांगितले.मागील वर्षी ठेकेदाराने रस्त्यासाठी थोडा भराव टाकला होता. मात्र, पावसाळ्यात तो धुवून गेला. रस्ताच नसल्याने जीवनावश्यक वस्तूंसाठी पाच किलोमीटर पायपीट करावी लागते, असे काळ्या पद्या कडू यांनी सांगितले.

आमदाराची बोलती बंद

भेटून समस्या जाणून त्यावर मार्ग काढला पाहिजे. परंतु, याबाबत विद्यमान आमदार निष्क्रिय ठरले आहेत. त्यामुळे न बोलणाऱ्या आमदाराला पुन्हा निवडून देणार का, असा सवाल जयंत पाटील यांनी केला आहे.नागाव येथील श्री सिद्धीविनायक मंदिर आणि वंखनाथ मंदिरात शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, सरपंच हर्षदा मयेकर, माजी सरपंच निखिल मयेकर, राजू मयेकर, ग्रामपंचायत सदस्य व शेकाप, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रचार दौऱ्यादरम्यान बोलताना जयंत पाटील म्हणाले की, अलिबाग-मुरूड आणि रोहा मतदारसंघातील लोकप्रिय उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई या उच्च शिक्षित आहेत. माझ्यासह ॲड. दत्ता पाटील व माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांनी या मतदारसंघातील जनतेची सेवा केली आहे. मात्र, आता सर्वच क्षेत्रात अभ्यासपूर्ण अशा महिलेला उमेदवारी दिली आहे. विधिमंडळात जे बोलायला पाहिजे, जे प्रश्न मांडायला पाहिजेत, ते काम मी केलं आहे. मात्र, यापेक्षा जास्त चित्रलेखा उर्फ चिऊताई करेल, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला आहे. तसेच विधिमंडळात बोलताना, कार्य करताना प्रत्येक कामकाजाची नोंद होत असते. यामुळे विद्यमान आमदारांनी विधिमंडळात काही न बोलण्याचा विक्रम केलेला आहे. आताच्या तरूण पिढीची अपेक्षा असते की त्यांचे प्रश्न सभागृहात मांडले गेले पाहिजेत. त्यांनी समस्या जाणून यावर मार्ग काढला पाहिजे. तरच त्या आमदाराला मत दिल्याचे सार्थक होईल. न बोलणाऱ्या आमदाराला जनता पुन्हा निवडून देईल का, तर नाही. आताही तेच करायचे आहे. घटक पक्षांसोबतच महिलावर्गदेखील चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना निवडून आणण्यासाठी जोमाने कामाला लागल्या आहेत. जो पक्षाशी गद्दारी करतो, तो मतदारांशी प्रामाणिक कसा राहील, हा विचार करून मतदान करण्याचे आवाहन जयंत पाटील यांनी केले आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अपघात

देवदूत यंत्रणा, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य यांनी बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढून लोकमान्य हॉस्पिटलच्या आणि स्वामिनी संस्थेच्या रुग्णवाहिकेमधून एमजीएम हॉस्पिटल येथे रवाना केले. अपघातग्रस्त बसमध्ये एकूण ३८ प्रवासी होते. त्यापैकी आठ जण गंभीर, तर १६ जण किरकोळ जखमी झाले आहेत. या अपघातात मनीषा भोसले, सुनिता तराळ, बालाजी सूर्यवंशी, संकेत घारे, अभिजित दिंडे, सरिता शिंदे, संदीप मोगे, सोनाक्षी कांबळे हे गंभीर जखमी झाले आहेत.ट्रक चालक महेश भिम रेड्डी मुसाने याला खोपोली पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे, तर बाळूमामा कंपनी खासगी बस चालक बालाजी सूर्यवंशी हा जखमी झाला असल्याने त्याच्यावर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या बसमध्ये प्रवास करणाऱ्यांमध्ये एका महिला फुटबॉल संघातील खेळाडूंचा समावेश होता.

अलिबाग शहरात प्रचाराचा धडाका

गोकुळनगर आदी परिसरातील कार्यकर्ते, मतदारांना भेटून मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. प्रचारासाठी मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. एक वेगळा उत्साह आणि उमेद घेऊन कार्यकर्ते मतदारांपर्यंत पोहोचत असल्याचे चित्र दिसून आले. यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगरसेविक प्रदीप नाईक, अश्विनी पाटील, राकेश चौलकर, प्रिया वेलकर, अनिल चोपडा, संजना कीर, संदीप शिवलकर, प्रकाश पावस्कर, अक्षया नाईक, चेंढरेचे माजी सदस्य ॲड. परेश देशमुख, नागेश कुलकर्णी, समीर ठाकूर, यतीन घरत, ममता मानकर, प्रशांत फुलगांवकर, प्रताप राऊत, संतोष पालकर, राम थळे, अमित नारे, रवि आंबेकर, संदीप किर, विनोद सुर्वे, शिवदास भगत, चिंतामण भगत, गणेश मुकादम, भगवान वरसोलकर, दत्ता लाते, पांडूरंग पेरेकर, जितेन सरतांडेल, आकाश पाटील, जनार्दन वरसोलकर, सुभाष वरसोलकर, विश्वनाथ पेरेकर, संजय कांबळे, बंड्या भगत, वासंती मुकादम, नासिकेत वरसोलकर, गजानन कुंडी, संदीप ढवळे, दिनेश कवाडे, मिथून बेलोसकर, सुरेश पाटील, शरद कापसे, नागेश्वरी हेमाडे, चापडे सर, भगत सर, चवकर, प्रशांत घरत, रामचंद्र लाडू, ॲड. रेश्मा चिमणे, अनिल चिमणे, दिलीप मानकर, विरेंद्र साळवी, विलास म्हात्रे, नरेश बैरी, लक्ष्मण पवार, सदी मासम, मोहनशी आचार्य, अभिजीत सातमकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

तुमची हाक, माझी साद

गाव बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, सुभाष वागळे, अशोक खोत, जनार्दन शेळके, अनंत पाटील, बाळू पाटील, नामदेव तांबडकर, नारायण म्हात्रे, रघुनाथ तांबडकर, मारुती म्हात्रे, जयवंत तांबडकर, नवनीत पाटील, महेश वावेकर, श्रीधर वावेकर, रामचंद्र भोईर, दत्तात्रेय भोईर, यशवंत भोईर, मदन तेलगे, विलास चवरकर, वसंत भुरे, अशोक पाटील, शशिकांत खारकर, संदेश वावेकर, राम पाटील, मिलिंद खोत, प्रीती तांबडकर, मोहन धुमाळ, महेश झावरे आदी सुडकोली ग्रामपंचायत परिसरातील गावांमधून शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तत्त्वांशी कधीच तडजोड करायची नाही, ही शिकवण प्रभू श्रीरामचंद्रांनी दिली. यामुळेच आम्ही अलिबाग, मुरुड आणि रोहा तालुक्यात विखुरलेल्या मतदारसंघासोबत कायम राहिलो आहोत. विकास साधण्यासाठी निधीची गरज लागते. निधी आणण्यात आपण कधीच कमी पडलो नाही. शेतकरी कामगार पक्षात आपले यश संपादन करून महेंद्र दळवी आणि दिलीप भोईर दुसऱ्या पक्षात गेले आणि आता शेकापच्या विरोधात उतरले आहेत. त्यांना आता जागा दाखविण्याची वेळ आली आहे. आता लाला बावट्याकडे मतदार वळविण्याची गरज निर्माण झाली आहे, असे चिऊताई म्हणाल्या. अलिबाग, मुरूड आणि रोहा तालुक्यात विखुरलेल्या मतदारसंघाचा विकास, बेरोजगार तरुणांना रोजगार आणि जनतेला अपेक्षित असणाऱ्या मूलभूत सुविधा पुरविण्यात महायुतीचे आमदार अपयशी ठरले आहेत. केवळ योजनांची खैरात करून जनतेला महागाईच्या खाईत लोटणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या धोरणामुळे जनता मेटाकुटीस आली आहे. विकास सोडाच, जनतेला विश्वास आणि स्थैर्य न दिल्याने अलिबाग विधानसभा मतदारसंघ विकासापासून दूर गेला असल्याचे टीकास्त्र महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी आमदार दळवींवर सोडले. सत्ताधारी असणाऱ्या महायुतीच्या सरकारला त्यांचा पराभव समोर दिसत असल्याने त्यांनी अनेक योजनांची खैरात केली आहे. गावांमध्ये विकासाच्या योजना आल्या; परंतु त्या योजना केवळ कागदावर राहिल्या आहेत. कोट्यवधींचा निधी आणला; परंतु त्याचा फायदा जनतेला नाही तर कंत्राटदारांना झाला आहे. यामुळे आपल्या विभागाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर महाविकास आघाडीला म्हणजेच शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांना निवडून देणे ही काळाची गरज आहे, असे स्पष्ट मत सुडकोलीचे ज्येष्ठ नेते अनंत पाटील यांनी मांडले.

परहूरचे युवा कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्षात

पक्षच विकास करू शकतो, हा विचार मनात घेऊन असंख्य तरुण शेतकरी कामगार पक्षात दाखल झाले आहेत. युवा पिढी शेकापमध्ये येऊ लागल्याने या निवडणुकीत विजय निश्चितच होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या कष्टाची राखरांगोळी

भातपिकाची कापणी करून शेतावर भारे साठवून ठेवण्यात आले होते. पहाटे ३.३० ते ४ च्या सुमारास काही विकृत वृत्तीच्या प्रवृत्तींनी हे वर्षभर पिकविलेले धान्य पेटवून देत राखरांगोळी केली आहे. या घटनेची माहिती कुटुंबियांना मिळताच त्यांनी शेतावर धाव घेतली; परंतु, तोपर्यंत सर्व जळून खाक झाले होते. आधीच नैसर्गिक संकटांनी शेतकरी हवालदिल झालेला असताना, या घटनेने शेतकऱ्यांवर उपासमारी ओढावली आहे. या शेतकऱ्यांनी काबाडकष्ट करून हातातोंडाशी आलेला घास लावलेल्या आगीमुळे नष्ट झाला आहे. या प्रकरणाची पोलिसांमार्फत सखोल चौकशी होऊन ज्या कोणी हा प्रकार केला आहे, या घटनेबाबत बोलताना ॲड. पंकज तरे यांनी मागे काही महिन्यांपूर्वी आमच्या शेतावरील बोअरवेलमधील मोटार काढून चोरून नेली व त्याचबरोबर बोअरवेलमध्ये दगड टाकून त्याचेही नुकसान करण्यात आले होते. या प्रकरणाची चौकशी पोलिसांनी करावी, अशी मागणी केली आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० नोव्हेंबर

१) श्री. दत्तात्रेय जवरू पाटील
कुरूळ, अलिबाग, १०-११-१९४२
२) श्री. सुरेश सदाशिव पाटील
शहाबाज, अलिबाग १०-११-१९४०
३) श्रीम. उषा शरद रानवडे
अलिबाग, १०-११-१९४४
४) श्रीम. प्रतिभा आनंद खडपकर
अलिबाग, १०-११-१९५४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

साप्ताहिक राशिभविष्य दि. १० नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२४

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

मनस्थिती द्विधा होण्याची शक्यता

मेष : हा सप्ताह मेषराशीधारकांना चांगली बातमी मिळणार आहे. आपल्याला अपेक्षित असणारी बातमी मिळू शकेल. एखादा जुना जिवलग मित्र मैत्रिणीची गाठभेट होईल, खूप दिवसांपासून मनात असलेल्या गप्पांना बाहेर पडता येईल. मात्र भावनेच्या भरात वाहत जाऊ नका, नाहीतर फसवणुकीला आपण अडवू शकणार नाहीत. दुसऱ्या बाजूला पती- पत्नीतील दुरावा संपून जाईल, दुराव्याची जागा प्रेम घेईल, वाहन खरेदीच्या बाजूने हालचाल करण्यास योग्य कालावधी आहे. एखाद्या पार्टीचे आमंत्रण येईल. स्वतःवर ताबा ठेवता येईल अशाच पार्टीला जा नाहीतर आपण हास्यापद होऊ शकाल. काळजी घेणे आपल्या हातात आहे, एका बाजूला मोजमज्जा आणि दुसऱ्या बाजूला अंगावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या यामुळे आपली मनस्थिती द्विधा होण्याचा संभव आहे. आपल्या सभोवतालचा माहोल करमणुकीचा असेल. **महिलांना-** महिलावर्गाचे दिवस आनंदात जाणार आहेत. प्रेम प्रकरणापासून लांब राहावे. पतिराजांच्या तब्बेतीची विशेष काळजी घ्यावी. त्यांना व्यसनांपासून लांब ठेवावे, जागरणाचा त्रास होऊ शकतो. **शुभदिनांक-** ११,१२.

कौटुंबिक प्रश्न सुटतील

सिंह : हा सप्ताह सिंहराशीसाठी प्रगतीकारक आहे, अनुभवी लोकांच्या योग्य मार्गदर्शनाने महत्त्वाची कामे वेळेत पूर्ण करू शकाल. जुनी येणी वसूल होऊ शकतील त्या बाजूने प्रयत्न करा यश मिळेल. कौटुंबिक जीवनात आनंदाचे क्षण अनुभवाल; षष्ठ व अष्टमस्थानातून होणारे चंद्राचे भ्रमण मनाची चंचलता वाढवणारी आहे. तेव्हा सर्वच अपेक्षेप्रमाणे व्हावे. तूर्तास तरी बाजूला ठेवा. व्यावसायिक स्तरावर मोठी कसरत करावी लागेल. सध्या फार मोठी गुंतवणूक करणे टाळा. हिशोबाची नोंद ठेवायला विसरू नका. नोकरीत आकस्मिक घडामोडी होतील. कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करा. अनेक विचार बाजूला ठेवून कार्यमग्न राहा. पूर्वी केलेल्या बचतीतून खर्चाचे तंत्र वाढवू नका. माहीत नसलेल्या गोष्टींवर न बोलणे केव्हाही चांगले. प्रेम प्रकरणापासून लांब राहा. **महिलांना-** महिलावर्गाने कुटुंबातील सर्व सदस्यांना जपण्याचा प्रयत्न करा. मानसिक एकाग्रता वाढवून अध्यात्मात मन रमवा. आरोग्य प्रश्नात वेळीच लक्ष घाला. घरात मोठी खरेदी करू शकाल घरात पाहुणे आले तरी आपली धावपळ होऊन देऊ नका. **शुभदिनांक-** १०,१३.

बुद्धिकौशल्याचा वापर करा

धनु : हा साप्ताह धनुराशीसाठी अपेक्षा नसताना देणारा आहे ज्यावेळी अपेक्षा नसताना मिळते त्याचा आनंद गगनात मावत नाही. नवीन नोकरी, व्यवसाय या बाबत हालचाल करण्यास हरकत नाही एखादी संधि आपल्याकडे चालत येणार आहे. अकल्पित वस्तु घेताना चुकीच्या गोस्टी ना प्राधान्य देऊ नका. सध्याच्या ग्रहांची अवस्था कामातील खाचखळगे कमी करणारे असतील. इतरांच्या विचारापेक्षा स्वतच्या बुद्धिकौशल्याचा वापर करा. बुद्धिमत्तेच्या जोरावर व्यवसाय प्रगती साधू शकता. सध्या फार मोठ्या नफ्याची अपेक्षा ठेवू नका. कमीतकमी तोटा सहन करावा लागणार नाही. किरकोळ गोष्टीतूनसुद्धा समाधान मिळण्याचे संकेत जास्त वाढू शकतात. संश इतरांकडून घेतलेले हातउसने पैसे परत करून जबाबदारीतून बाहेर पडाल. व्यसनी लोकांपासून लांब राहा. **महिलांना-** महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. घरातील वृद्ध व्यक्तींच्या तब्येतीत सुधारणा होईल. योग साधनेला महत्त्व द्या. शारीरिक ताकद अजमावून पाहू नका. नंतर संधि मिळणार आहे फक्त थोडा संयम ठेवा. **शुभदिनांक-** ११,१५.

नोकरदार वर्गात नाराजी

वृषभ : हा सप्ताह वृषभराशीसाठी महत्त्वाकांक्षा वाढवणारा ठरणार आहे. व्यापारीवर्गाला व्यापाराचे नवा मार्ग सापडेल. त्यामुळे आर्थिक परिस्थिती चांगली होऊन आपले ध्येय गाठणे सोपे होईल. क्षितिजापर्यंत जाण्याचा मार्ग सापडेल. आपण घेतलेले निर्णय यशस्वी ठरतील. त्याचप्रमाणे आपण मनात असलेली गुंतवणूक त्या मार्गाने पाऊले उचलली जाणे यांचे समीकरण उत्तम जमेल. नोकरदारांना जास्तीचे काम करावे लागले तरी त्याचा योग्य परतावा मिळेल. आपले अधिकारी आपल्यावर खुश होतील. आपण नोकरी धंद्यात नियमांचे योग्य पालन केल्यास कामावर पकड बसेल. पैशाचे गणित आपल्यासाठी लाभदायी ठरेल. अनेक कामकाजात आपला आवाज वरच्या पातळीवर राहू शकेल. आपण एखाद्या घरगुती कार्यक्रमाचे आयोजन कराल. तो यशस्वी कराल आपले मित्र मैत्रिणी सोबत करमणूक करून आनंद वाढवाल. **महिलांना-** आपल्या नात्यातील सलोखा वाढता राहील. मुलांचे कर्तृत्व तुमच्या डोळ्यांचे पारणे फेडेल. मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले राहील. **शुभदिनांक-** १४,१५.

भूलथापांना बळी पडू नका

कन्या : हा सप्ताह कन्याराशीसाठी शत्रूची ताकद वाढवणारा आहे. विरोधक आपल्याला पाडण्यासाठी कोणत्याही पातळीबर जाऊ शकातात, आपण डोक्यात कोणताही राग न ठेवता आपले कार्य करा आपल्यापाठी चांगल्या कार्याची पोचपाबती उपयोगी पडणार आहे, या काळात न झेपणाऱ्या गोष्टींसाठी प्रयत्न करणे टाळा. कोर्ट प्रकरणात स्वतःहून गुंतागुंत करू नका. कला, साहित्य, शिक्षण इत्यादी क्षेत्रांत स्पर्धा करणे टाळा. व्यवहार क्षेत्रात व्यवहाराच्या नोंदी सूक्ष्म स्वरूपात ठेवा. कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. ग्राहकांची फसवणूक होऊ देऊ नका. नोकरीत कामाव्यतिरिक्त भलताच प्रश्न उभा करू नका. आतापर्यंत पाठीशी असलेले लोक पाठ फिरवत नाहीत ना याचे निरीक्षण करा. मोठ्या खर्चावर वेळीच नियंत्रण आणा. सामाजिक गोष्टीतून नियोजनबद्ध आखणी करून मोठा विकास साधू शकाल. **महिलांना-** महिलावर्गाने संततीच्या आरोग्याची काळजी घ्या. जोडीदाराला सूचणाऱ्या कल्पना प्रगतीचे स्वप्न असेल. कौटुंबिक कार्यक्षमता वाढवा. दैव अनुकूल राहील. स्वतची तब्येत सांभाळून काम करा. मनात विचाराची गर्दी करू नका. **शुभदिनांक-** ११, १४.

गुंतवणूक करणे फायद्याचे

मकर : हा सप्ताह मकरराशीसाठी संगतीचा परिणाम अधोगतीत तर होणार नाही ना हे पाहणे गरजेचे ठरेल. आर्थिक व्यवहारात प्रत्येक पाऊल जपून टाकणे महत्वाचे ठरणार आहे. आपण खोटे बोलण्या पासून आणि खोटे बोलणाऱ्या पासून लांब राहणे आपल्या भविष्यासाठी चांगले आहे, या कालावधीत कौटुंबिक कलह निर्माण करू नका. व्यवसायात जम बसेपर्यंत घाई करू नका. उधारीचे व्यवहार सध्या बंद ठेवा. रोख स्वरूपात असणारी गुंतवणूक फायदा मिळवणारी असेल. बिनभरवशाच्या व्यक्तीवर अवलंबून राहू नका. कामाच्या ठिकाणी वेळेला महत्त्व द्या. सुधारित घटनांचा क्रम नीट लावून घ्या. लेखनकार्याची आवड निर्माण होईल. कामानिमित्त वाढणारा संवाद तुमच्या वक्तृत्वाची दाद देईल. कर्जबाजारीपणा कमी होईल. आर्थिक साहाय्य उत्तम राहील. सामूहिक गोष्टींसाठी ठरवलेले नियोजन उत्तम जमेल. **महिलांना-** स्थावर मालमत्तेचे नियोजन करताना कागदपत्रांची नीट तपासणी करा. भावंडांची जबाबदारी पार पाडावी लागेल. सांस्कृतिक कार्यक्रमाची गोडी वाढेल. बारीकसारीक दुखण्याचा बाऊ करणे टाळा. संसर्गजन्य आजारा पासून तब्बेत सांभाळा. **शुभदिनांक-** १३,१६,

नियोजनानुसार स्वरुप ठरवा

मिथुन : हा साप्ताह मिथुनराशीसाठी वेगळा ठरू शकतो. आपल्यावर असणाऱ्या जबाबदाऱ्या वाढवत जाऊ नका, ग्रहांची पकड घट्ट राहील. कामात आलेल्या अडथळ्यांचे प्रमाण कमी होऊ लागेल. आगामी काळासाठी केलेला विचार योग्य ठरेल. अपेक्षित फलप्राप्ती वाढलेली असेल. उत्पन्नातील घटते प्रमाण कमी होईल. ग्राहकांची मने वळवण्यास अनुकूलता राहील. नोकरदार वर्गाने अंगलट येणाऱ्या गोष्टींपासून लांब राहावे. जास्तीची जबाबदारी घेताना विचार करा. नियोजनानुसार स्वरूप ठरवा. आपले योगदान राजकीयबाबत्तीत महत्वाचे ठरणार आहे. व्यसनी मित्रांच्या संगतीपासून लांब राहा. इतरांना सल्ला देताना बोलण्यातील जरब धारदार करू नका. नाहीतर समोरच्याचा गैरसमज होऊन आपले नुकसान होऊ शकते त्यामुळे आपली भाषा गोड ठेवा. कुटुंबातील व्यक्तींची जबाबदारी वाढेल. आरोग्याच्या बाबतीत अजूनही आपण रेड झोन मध्ये राहणार आहात हे विसरू नका. **महिलांना-** महिलावर्गाने या कालावधीत आपल्या मनातील विचारांना पूर्णत्व देण्याच्या दृष्टीने हालचाल केली तर आपणाला सहज यश मिळेल **शुभदिनांक-** १३,१६.

सामाजिक कार्यात सहभाग महत्त्वाचा

तुळ : हा साप्ताह तुलराशीसाठी समाधान कारक असणार आहे, संपत्ति विषयक प्रश्न आपल्या घरातून हळू हळू सुटू लागतील घरातील विरोधक ही आपल्याशी या बाबत बोलण्यास तयार होतील त्यामुळे यावेळेचा सदुपयोग करा आपली उधारी आता वसूल होणार आहे त्याचे टेंशन घेऊ नका पुरेसा पैसा हाती येईल. सप्ताहाची सुरुवात ग्रहांची अनुकूलता असली तरीसुद्धा धाडसी प्रयोग टाळा. व्यावसायिक क्षेत्रात स्वतच्या कौशल्याचा वेगळा ठसा उमटवता येईल. वाढणाऱ्या कार्यशक्तीतून सहज मार्ग स्वीकारा. दुहेरी वाटेवरून आपली वाटचाल घसरू देऊ नका. जुन्या गोष्टी विसरणे हिताचे राहील. नोकरदार व्यक्तीला मिळणारी बढती लांबणीवर जाईल. ज्येष्ठांचा पाठिंबा असला तरी थांबावे लागेल. सध्या कोणालाही दुखवू नका. ठरवलेले काम करून घेण्याचा प्रयत्न करा. **महिलांना-** महिलावर्गाने पैशाच्या बाबतीत अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मत्रीच्या नात्यात व्यक्तिगत स्वार्थ साधू नका. सामाजिक कार्यात आपला सहभाग मर्यादित ठेवा. आपल्या वैवाहिक जोडीदाराची मानसिकता हट्ट स्वरूपाची राहील. **शुभदिनांक-** १५,१६.

थोरामोठ्यांचा विश्वास संपादन करा

कुंभ : या सप्ताहात आपल्याकडे येणाऱ्या पैशांची आवक वाढणार आहे, मात्र खर्चावर नियंत्रण ठेवणे भाग आहे, आपल्या मनाप्रमाणे कामे सुरळीत होणार आहेत. घरासाठी खर्च होईल. जागा जमीन यांचा व्यवहार करत असाल तर फायदा होईल. मोठी पार्टी चालून येईल थोडे कामाच्या पाठी लागा. यश मिळू शकेल, या ग्रहस्थितीमध्ये असणारा योग उत्तम राहील. अवतीभवतीचे चित्र मनासारखे असेल. व्यवसायाच्या दृष्टीने आगामी काळाचा अंदाज चांगला येईल. अनुकूलतेची चाहूल लागेल, पण ताटात वाढलेले पदार्थ प्रत्यक्षात तोंडात जाईपर्यंत काही होऊ शकते. नोकरदारांना मिळणारा थोरामोठ्यांचा विश्वास यातून चांगल्या गोष्टी घडवण्यासाठी सिद्ध व्हाल. मात्र चारी बाजूंनी आवश्यक असणारी खबरदारी घेणे आवश्यक ठरेल. या सगळ्यातून वाढणारी जबाबदारी विसरू नका. कोठेही कायद्याचे उल्लंघन करू नका. **महिलांना-** आपल्या नियोजनात अचूकपणा असेल तर कर्जफेड उत्तम प्रकारे कराल. कौटुंबिकदृष्ट्या शुभ गोष्टींचा ओघ राहील. स्वतचे आरोग्यतंत्र सांभाळणे आवश्यक ठरेल. **शुभदिनांक-** १४,१६.

प्रयत्नांना गती मिळेल

कर्क : हा साप्ताह कर्कराशीधारकाने आर्थिकदृष्ट्या जपून पावले टाकण्याची गरज आहे. राजकीय क्षेत्रातील आपले कर्तव्य बिनादिक्कत पार पाडा. तुमचे वक्तृत्व योग्य दिशा दाखवणारे असेल, सध्याच्या कालावधीत घाईगडबड व पळापळीने आपला दिनक्रम करू नका. हळुवारपणाने वाटचाल राहू द्या. पोलीस, मिलिटरी, वैद्यकीय इत्यादी क्षेत्रांतील व्यक्तींना धाडसी पराक्रम करावे लागतील. जबाबदारीने उचललेले पाऊल यशस्वीरीत्या पार पडेल. निर्माण झालेल्या प्रश्नातून मार्ग निघेल. नोकरदार वर्गाला परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे लागतील. ठरलेला दिनक्रम बदलत जाईल. अनपेक्षित मिळालेल्या लाभातून योग्य गुंतवणूक करा. राजकारणातील वातावरण भडक होऊ देऊ नका. सामंजस्याने तोडगा काढा. नात्यातील गैरसमजाची वाढलेली दरी कमी होईल. वैवाहिक जीवनातील प्रयत्नांना संथ गती मिळेल. **महिलांना-** कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घेणे हिताचे राहील. आपण वाहन चालवत असाल तर काळजी घेऊन ते

गद्दारांविरुद्ध खुद्दार

रायगड जिल्ह्यात सात विधानसभेच्या मतदारसंघांमध्ये आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणे बदलण्याच्या हालचालींना वेग आला आहे. एकीकडे महाआघाडी विरुद्ध महायुतीच्या लढाईत शिंदे गटाला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लढणारा शेकाप पक्ष पुन्हा नव्याने उभारी घेत आहे.

शेकापचा हा पक्ष रायगडात पूर्वीपासूनच कामगार, शेतकरी आणि गोरगरिबांच्या न्यायासाठी लढणारा म्हणून ओळखला जातो. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरावर कार्य करताना शेकापने अनेकदा शेतकऱ्यांसाठी लढा दिला. त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सरळमार्गे मदत करण्याचे कार्य त्यांनी केले. परंतु याच पक्षावर काही खासदारांनी वेळोवेळी फसवणूक केल्याचा आरोप शेकापने लावला आहे.

समीर बामुगडे, रोहा

शेकाप पुन्हा एकदा गोरगरीब, शेतकऱ्यांसाठी न्यायाचा आवाज उचलण्यासाठी सज्ज झाला आहे.

शेतकऱ्यांसाठी 'अदानी हटाव'ची लढाई

रायगड जिल्ह्यातील शेतकरी, प्रकल्पग्रस्त हे आता मोठ्या संख्येने 'अदानी हटाव, शेतकरी बचाव'चा नारा देत आहेत. अदानीसारख्या उद्योगपतींनी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्यांना योग्य मोबदला न दिल्याचे आरोप आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या मते, अदानींच्या उद्योग विस्ताराचा फटका शेतकऱ्यांना बसतोय. रायगडातील खासदारांनी दलालांच्या माध्यमातून जमिनी विकत घेण्याची मोहीम सुरू केली आहे, असा आक्षेपही घेतला जात आहे.

यातच विशेष म्हणजे रायगड जिल्ह्यातील खासदार हा गरजेनुसार रंग बदलणारा, म्हणजेच 'सरड्यासारखा रंग बदलणारा' म्हणून ओळखला जातोय. त्यांचा भूमिकाही शेतकऱ्यांच्या पाठिशी राहण्याऐवजी उद्योगपतींच्या बाजूने दिसून येतोय. जिल्ह्यात शेतकऱ्यांनी आता अशा गद्दारांना दूर सारून खऱ्या खूद्दारांचा पक्ष निवडावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

'प्रकल्पग्रस्तांचे दुःख समजून घेणार कोण?'

रायगडमध्ये शेकापने प्रकल्पग्रस्तांसाठी वेळोवेळी आवाज उठवला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, सरकारने विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या, पण त्यांना योग्य मोबदला दिला नाही. यावरही शेकापने आक्षेप घेतला आहे आणि प्रकल्पग्रस्तांच्या बाजूने आवाज उठवण्याचा निर्धार केला आहे. रायगडच्या प्रकल्पग्रस्तांनी आता शेकापकडे पुन्हा एकदा आशेने पाहिले आहे. एकीकडे शेकापने न्यायहक्काचा लढा दिला, तर दुसरीकडे काही गद्दारांनी त्यांची फसवणूक केली. हेच गद्दार आता पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात आहेत, पण मतदार राजा त्यांना धडा शिकवण्यासाठी सज्ज आहे.

- शेतकरी आणि गोरगरिबांच्या बाजूने शेकाप पुन्हा मैदानात
- अदानी हटावचा नारा: शेतकऱ्यांसाठी शेकापचा निर्धार

महाविकास आघाडी विरुद्ध महायुती

रायगड जिल्ह्यात आगामी निवडणूक ही गद्दार आणि खूद्दार अशीच लढाई होणार आहे, असा कौल मतदारांनी दिला आहे. शिंदे गटाला या निवडणुकीत मोठा धक्का बसण्याची शक्यता असून, श्रीवर्धन, महाड, अलिबाग अशा मतदारसंघात या गद्दारांविरुद्ध खरे पक्ष कार्यकर्ते उभे राहणार आहेत. रायगडातील सात विधानसभा मतदारसंघांमध्ये शेकाप, शिवसेना (उद्धव ठाकरे गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट), आणि काँग्रेस या पक्षाकडून ताकदीची लढत होणार आहे. श्रीवर्धन मतदारसंघात अजित पवार गटाच्या उमेदवारासमोर शेकाप आणि उबाठ गट यांचे समर्थक एकत्र येऊ शकतात. निवडणुकीत गद्दारांविरुद्ध खूद्दारांचा आक्रोश उमटू शकतो, असे दिसत आहे. मतदार राजा शेकापकडे पाठ फिरवण्यास तयार नाही. ते पुन्हा या लढाऊ पक्षाला संजीवनी देण्यासाठी सज्ज झाले आहेत. महाविकास आघाडीचे वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी अनेक कार्यकर्ते प्रयत्न करत आहेत, असे संकेत मिळत आहेत.

रायगडात खऱ्या नेतृत्वाची गरज

रायगड जिल्ह्यातील शेतकरी, कामगार, प्रकल्पग्रस्त यांना आज एका खऱ्या नेतृत्वाची गरज आहे, जो त्यांच्यासाठी खंबीरपणे उभा राहील. शेकाप हा जिल्ह्यातील शेतकरी व गरीबांच्या न्यायासाठी लढणारा, आवाज देणारा पक्ष म्हणून प्रसिद्ध आहे. महाविकास आघाडीतील उबाठ, राष्ट्रवादी आणि शेकाप या गटांच्या एकत्र येण्यामुळे गद्दारांना चांगला धडा शिकवला जाईल, अशी अपेक्षा आहे.

गद्दार विरुद्ध खूद्दाराची ही निवडणूक

रायगड जिल्ह्यातील ही निवडणूक केवळ महाआघाडी विरुद्ध महायुतीची नाही, तर गद्दार विरुद्ध खूद्दार अशी खरी लढाई होणार आहे. या निवडणुकीत मतदार राजा खऱ्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी उभा राहिल. शेकापसारख्या लढाऊ पक्षाला पुन्हा एकदा पाठबळ देऊन जिल्ह्यात न्यायहक्क प्रस्थापित करण्यासाठी आणि गद्दारांना धडा शिकवण्यासाठी मतदार राजा सज्ज आहे.

दिवाळी 'चावदिस' सण सुख संपन्नतेचा!!...

कोकणपट्ट्यात विशेषतः मालवण भागात सर्रासपणे बहुतांश गावागावातील लोक दसऱ्याच्या सुमारास शेतात पिकणाऱ्या भाताचे पोहे कुटुन घेऊन येतात. पोहे कांडप गिरणीवर या कालावधीत तुफान गर्दी असायची. एक दिवस आधी भात व्यवस्थित पाण्यात भिजत ठेवायचे आणि दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे लोक पोह्यासाठी भिजवलेले भात घेऊन सात आठ किलोमीटर दूर पोहे गिरणीवर पोहे कुटुन घेण्यासाठी जायचे. तेथे गिरणी एक मोठा गरम तवा मोठ्या कढईसारखा असायचा त्यात वाळू असायची त्या वाळूमध्ये ते भिजवलेले भात चांगले भाजून घेतले जाई. चाळणीच्या झाऱ्याने ते भात भाजणारा व्यवस्थित ते भाजून देई. भाजणीसाठी नंबर लागला की पोहे कुटण्यासाठी आलेल्या माणसाचा जीव भांड्यात पडत असे कारण भाजणी झालेल्या भाताचे काही वेळातच पोहा म्हणजे 'फॉव' कुटण्यासाठी नंबर लागायचा. लालसर करडस रंगाचे पोहे गणीबॅग मध्ये भरुन गहु तांदळाच्या गोणी सारखे प्रत्येक शेतकरी पोहे कुटुन आणायचा. मग एक दोन महिने फुट्या म्हणजे कोकाकोलासारख्या कोऱ्या चहाबरोबर ते पोहे सहकुटुंब सहपरिवार नियमितपणे खातात. गावच्या शेतकऱ्यांची दिवाळी म्हणजे आणखी वेगळी काय असणार म्हणा? नुकतीच भातकापणी झालेली असते. घरात शेतातलं धान्य आलेले असते. घरमालक आणि मालकीण अतिशय आनंदात असतात. कारण सुगीचे आनंदाचे दिवस आलेले असतात. राबराब राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरात धान्यरुपी देवी अवतरलेली असते. घरचं वातावरण प्रसन्न असते.

धनंजय शेटये

मासे सुद्धा या सुगीच्या दिवसात भरपूर मिळतात. वस्तुविनिमय पद्धतीने मासे विक्रेते मासे विकतात आणि त्या मोबदल्यात भात घेतात. अशा सुगीच्या दिवसांना 'सराय'चे दिवस असे संबोधले जाते. या काळात मिळत असलेला बांगडा खासच!!! 'बांगडा' विशेषतः मालवणचा पिवळसर शेवाळी रंगाचे भलेमोठे मोठे 'मालवणी समुद्री बांगडे' चवदार असतात. मालवणी बांगड्यांची ही चव जगाच्या पाठीवर कुठे आढळणार नाही.लालेलाल मिरची, त्रिफळा आणि तेलाची धार, नारळ वापरुन केलली झणझणीत मालवणी 'बांगड्याची करी' आणि 'तळलेले चविष्ट मासे' आणि पांढरी शुभ्र तांदळाची भलीमोठी भाकरी आणि उकडा भात!! हे जेवण.अहाहा!! ही म जा काय औरच!! मालवणी मसाला जगाच्या पाठीवर सर्वश्रेष्ठ बनविण्याचे सामर्थ्य हे अशा खमंग झणझणीत खाद्यपदार्थांमुळे प्राप्त झाले असावे यात तीळमात्र शंका नाही.

दिवाळीची खरी चाहुल लागते ती पोहे म्हणजे फॉव कुटण्याच्या लगबगीने! प्रत्येक घरात पोहे कुटून आणले जातात. 'चावदिस' म्हणजे दिवाळीचा पहिला दिवस. नरक चतुर्दशीला मालवणात 'चावदिस' असेच संबोधले जाते. खलप्रवृत्तींचा नाश करुन मनात चांगले पावित्र्यमय विचार निर्माण करण्यासाठी काडीसारखी दिसणारी भयानक कडु फळ म्हणजे 'कारीट' हे 'चावदिसा' दिवशी पायाने फोडुन वाईट गोष्टींचा नाश करायचा.'चावदिसा' दिवशी भल्या पहाटे उठायचं. घराबाहेरच्या परसदारी न्हानी तिथे एक भलंमोठं मडकं सतत चूलीवर ठेवलेले असायचे. पहाटेला लवकर उठून न्हाणीतल्या चूलीत नारळाच्या जावळाच्या वाळलेल्या पानांपासून आग पेटवायची आणि गरम पाण्याने आंघोळ करायची. ओल्या अंगाने तुळशीसमोर सुबक रांगोळीवर रचून ठेवलेल्या कारीटाला जोरात लाथेने तुडवायचे आणि जोरात भगवान श्रीकृष्णाच्या नावाने आरोळी ठोकायची,

''गोविंदा र गोपाळा,
यश्वदेच्या तान्ह्या बाळा!''

असं जोरात बोलायचं वाडीतील लवकर 'चावदिस' साजरा करणाऱ्या मित्रपरिवाराला आपण केवढे लवकर उठलो हे समजावे हाच केवळ उद्देश असतो. अर्थात इथेही पहिला कोण उठतो या मध्येही एक स्पर्धा असायची. मग देवपूजा केली जायची. सकाळी सकाळी पूर्वीच्या काळी मुंबई आकाशवाणी केंद्रावर नरकचतुर्दशीला कीर्तन असायचं. आईवडिलांच्या संस्कारांमुळे बालपणी ते न चुकता ऐकायचो. दिवाळीचे पाच दिवस मग आकाशवाणी केंद्रावर नभोनाट्य असायचे. त्याकाळी श्रीराम केळकर हे माझे आवडते उद्घोषक. तर आमिन सयानी यांचा 'सिबाका गीतमाला' हा कार्यक्रम म्हणजे माझ्या आयुष्यात सर्वांत जास्त आवडीचा कार्यक्रम असायचा. रेडियो जॉकी आमिन सायानी यांच्या आवाजाने मी भारावून जायचो.' ''बहनो भाईयो.....''हे त्यांचे शब्द अगदी थेट हृदयापर्यंत पोहोचायचे.

'चावदिसा' दिवशी भल्यापहाटे आमच्या वाडीच्या भजनमंडळाच्या मांडावर सूर्य उगवेपर्यंत जल्लोषात भजन केले जाते. शेवटी,

''सूर्य उगवला,
प्रकाश पडला,
आडवा डोंगर,
तयाला माझा नमस्कार''

हा अजरामर गजर घेतला जातो. शेवटी भजनाला 'गुळात भिजवलेले पोहे' दिले जायचे. त्या चावदिसाच्या फराळाची चवही काही खासच असायची.

असायचा आमचा चावदिस. ●●

खरे तर निवडणुका स्वबळावरच लढवल्या गेल्या पाहिजेत

निलेश साठे

वर्ष १९९५ पासून महाराष्ट्रामध्ये आजतागायत एकाही पक्षाची एक हाती सत्ता आलेली नाही. युती महायुती आघाडी अशीच सत्ता आली आहे. मग महाराष्ट्रामध्ये एक हाती सत्ता कधी कोणाची येणारच नाही का. की हे असंच चालणार आणि कुठपर्यंत चालणार. जोपर्यंत हे राजकीय पक्ष मिळून मिसळून निवडणूक लढवणार तोपर्यंत कदाचित हे असंच चालत राहणार. खरे पाहता प्रत्येक पक्षाने निवडणुका या प्रत्येकाने स्वबळावरच लढल्या पाहिजेत. निवडणुका झाल्यावर या तुम्ही परत, युती महायुती आघाडी करा. परंतु निवडणुका या स्वबळावरच लढवा. त्यामुळे कोण किती पाण्यात आहे तेही समजेल. आणि जनतेची खरी कामे कोण करत आहे ते सुद्धा जनतेला समजेल. युती महायुती आघाडीत काय बिघाडी असेल तर निवडणुकीमध्ये ते समजून येईल आणि सत्तेची चावी कोणाकडे द्यायची ही जनता जनार्दन ठरवेल. त्यामुळे निवडणुका या स्वबळावर लढवल्या गेल्या पाहिजेत. स्वबळावर निवडणुका का लढवल्या जात नाहीत हा मोठा प्रश्नच आहे. आज पंचवीस वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला आहे महाराष्ट्राला एक हाती सत्ता माहीत नाही.

बरं कोण कोणत्या पक्षांमध्ये आहे तेही कळायला मार्ग नाही. आता एखादा आमदार ज्या पक्षाच्या नावाने प्रचार करत असेल तर पुढच्या क्षणी तो दुसऱ्या पक्षातून प्रचार करताना दिसून येऊ शकतो असे वातावरण निर्माण झाले आहे. सत्तेवर नेमका कोणता पक्ष आहे हेही एक कोडेच आहे. जो पक्ष सत्तेत आहे तोच पक्ष विरोधातही आहे. आणि जो विरोधात आहे तोच पक्ष सत्तेतही आहे. म्हणजे हे महाराष्ट्राच्या राजकारणात काय चाललंय तरी काय. न भूतो न भविष्यती अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एकदा स्वबळावर लढा तरी. एकदा सर्वच पक्षानी आपापली ताकद आजमावून पहावी. त्यानंतर मग आहेच की, या एकत्र. करा आघाडी. युती महायुती. जनतेचा कौल बघा तरी नक्की कोणाकडे आहे. त्यासाठी सर्वच पक्षांनी निवडणुका या स्वबळावर लढवल्या गेल्या पाहिजेत. या पक्षातून त्या पक्षात आणि त्या पक्षातून या पक्षात अशा वृत्तीमुळे नेत्यांची प्रतिमा देखील खालावत चालली आहे. लोकांनी तरी मग विश्वास कसा ठेवायचा. कोणता नेता चांगला आणि कोणता नेता वाईट. कसे ठरवायचे. समाज कल्याणकारी नेता कसा ओळखायचा. पक्षांतर करणारे नेते स्वतःच्या स्वार्थासाठी तर पक्षांतर करत नसतील ना. अशी चर्चा जनसामान्यात होऊ लागते. येत्या निवडणुकीमध्ये आपली डागाळलेली प्रतिमा धुण्याची नामी संधी नेते मंडळींना आलेली आहे सर्व पक्षप्रमुखांनी आपला नेता आपल्या सोबत कसा राहील याची पुरेपूर काळजी घेतली पाहिजे. नेत्यांनीच जर इकडे तिकडे उड्या मारल्या तर सर्वसामान्य मतदारांनी जायचे कुठे. त्यामुळे सर्वच पक्षप्रमुखांनी आपल्या मतदाराचा आदर राखत आपला एकही नेता फुटता कामा नये याची पुरेपूर काळजी घेऊन निवडणुका स्वबळावर लढवावी. तेव्हाच समजेल कोण किती पाण्यात आहे. ●●

स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लुप्त्या व युक्त्या

सरासरी

आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५

गणित विषय हा मानवी व्यवहारातून आणि निसर्गाच्या निरीक्षणातून मानवाने केलेली निर्मिती आहे.गणित विषय मानवी विचार पध्दतीच्या मुळाशीजाते आणि ते विचार नेमक्या शब्दात व्यक्त करते. गणित विषय वास्तव सृष्टीचे संबोधाच्या सृष्टीत रुपांतर करणे आणि वास्तव सृष्टीतील व्यवहारांचे नियमन करणाऱ्या संबोधाच्या गुणधर्माचा अभ्यास करते. दैंनदिन व्यवहारात लागणारे गणित म्हणजे या संबोधाचे सार आहे. म्हणूनच ते समजण्यास सोपो आहे. गणितातील कित्येक संबोध आपल्याला सहजबुध्दीने सुचत असले तरी ते नेमके व्यक्त करण्यासाठी योग्य त्या संज्ञा, चिन्हे आणि नियम तयार करण्याचीआवश्यकता असते. म्हणजेचप्रथम आपल्याला गणिताची विशिष्ठ भाषा आणि लिपी जाणून घ्यावी लागते. आजच्या लेखात आपण सरासरी हा संबोध समजून घेणार आहोत.

सरासरी म्हणजे काय ?

''वस्तूंची वाटणी सारख्या प्रमाणात केली असता ती वाटणी दर्शविणाऱ्या संख्येला सरासरी असे म्हणतात.

व्याख्या

''सरासरी म्हणजे दिलेल्या सर्व संख्यांची एकूण बेरीज भागिले एकूण संख्या''

सूत्र:- सरासरी= एकूण संख्यांची बेरीज / एकूण संख्या

सरासरीचे गुणधर्म :-

१.संख्यांच्या सरासरीस त्या संख्येच्या माध्यमान संख्या असेही म्हणतात.

२. दोन गटांची तुलना करण्यासाठी ज्या गटांची सरासरी काढणे सोपे असते.

३. दिलेल्या निरनिराळ्या राशींची बेरीज करून त्या बेरजेस राशीच्या एकूण संख्येने भागले असता मिळणाऱ्या सख्येस त्या राशींची सरासरी असे म्हणतात.

४. क्रमवार समसंख्या व विषम संख्यांची सरासरी मधल्या संख्येएवढी असते.

५. कोणत्याही क्रमवार संख्यांचीसरासरीही त्या संख्या मधली संख्या असते.

सरासरी कशी काढायची

दिलेल्या मूल्यांच्या संचासाठी आपण सहजपणे सरासरी काढू शकतो. आपल्याला फक्त सर्व मुल्ये जोडायची आहेत.आणि दिलेल्या मूल्यांच्या संख्येने परिणाम विभाजित करावा लागेल.

तीन सोप्या पायऱ्या वापरून सरासरी काढता येते.

पायरी १ :- संख्यांची बेरीज

संख्यांची सरासरी शोधण्याची पहिली पायरी म्हणजे दिलेल्या सर्व संख्यांची बेरीज शोधणे

पायरी २ : निरीक्षणांची संख्या

पुढे दिलेल्या डेटासेट मध्ये किती संख्या आहेत हे मोजायचे आहे.

पायरी ३: सरासरी गणना

सरासरी काढण्याची अंतिम पायरी म्हणजे निरीक्षणांच्या संख्येने विभाजित करणे.

हे ही समजून घ्या व लक्षात ठेवा.

अ) सरासरी काढण्यासाठी संख्या जास्त असतील तर वारंवारता सारणी तयार करून सरासरी काढता येते. उदा २० गुणांच्या गणिताच्या चाचणी परीक्षेमध्ये इयत्ता ८ वी च्या वर्गातील ५० विद्यार्थ्यांना मिळालेले गुण पुढील सारणीत दिले आहेत. त्यावरून विद्यार्थ्यांच्या गुणांची सरासरी काढा.

विद्यार्थ्यांना मिळालेले गुण (xi)	विद्यार्थ्यांची संख्या (Fi)	Fix Xi
19	2	38
17	5	85
15	8	120
12	5	60
10	10	100
08	15	120
06	05	30
	N=50	£FiXi=553

$$X=\frac{Fi \times Xi}{N}$$

X=553
50

सरासरी = ११.०६

(सूचना £ या चिन्हाचा अर्थ स्तंभातील सर्व संख्यांची बेरीज)

B) वेग = अंतर / वेळ (वेग)

हे सुद्धा सरासरीचे उदाहरण आहे.

$£A= \pi r^2$

C) क्रमवार सांख्यांची सरासरी = पहिली संख्या + शेवटची संख्या २

D) एकूण बेरीज = सरासरी X एकूण संख्या

१) सरावासाठी उदा. ०१ एका क्रिकेटरची ३० सामन्यातील धावांची सरासरी ५० आहे. त्यापैकी १८ सामन्यांतील सरासरी ३० आहे. तर राहिलेल्या सामन्यांतील सरासरी धावा किती.

एकूण धावा = सरासरी X एकूण सामने

= ५० X ३० = १५००

३० सामने

= ३० X १८ = ५४० १८ सामने

१२ सामन्यांतील एकूण धावा = १५००-५४० = ९६०

१२ सामन्यांतील सरासरी = ९६०/१२ =८०

२) रमेश सुरेश देवेश यांच्या वजनाची सरासरी ५० किलो आहे. रमेशचे वजन ५२ किली व सुरेशचे वजन ५६ किलो असेल तर देवेशचे वजन किती?

वयाची बेरीज = सरासरी X एकूण संख्या

५२ + ५६ + X=५०X३

१०८ + X=१५०

X=१५०-१०८

X=४२

३) पहिल्या तीस क्रमवार नैसर्गिक संख्यांची सरासरी किती ?

पहिल्या क्रमवार नैसर्गिक संख्यांची सरासरी = (एकूण संख्या + २)/२

या सूत्राचा वापर करून वरील उदाहरण सोडवा.

४) एका वर्गातील ५० विद्यार्थ्यांना सरासरी ४८ गुण मिळाले. राहिलेल्या २५ विद्यार्थ्यांना ५४ गुण मिळाले. तर वर्गातील एकूण विद्यार्थ्यांना सरासरी किती गुण मिळाले ?

एकूण गुण = सरासरी X विद्यार्थी

४८ X ५० =२४०० ... ५० विद्यार्थी

५४ X २५ =१३५० ... २५ विद्यार्थी

२४०० + १३५० = ३७५० = ५० गुण
७५ ७५

७५ ही विद्यार्थी संख्या आहे. ५० गुण ही वर्गाची सरासरी आहे. ●●

ग्रामीण उत्कर्षासाठी उपयुक्त

हिरवं सपान

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी पथदर्शी ठरलेल्या शांतिवनच्या प्रयोगाची गोष्ट... ''हिरवं सपान'' हे डॉ. नीलम ताटके लिखित पुस्तक पुण्याच्या उत्कर्ष प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. सुरुवातीला

''शांतिवनची गोष्ट...'' मध्ये पुस्तकाची पार्श्वभूमी सविस्तरपणे मांडली आहे. थोर समाजसेवक बाबा आमटे यांच्या सोमनाथ प्रकल्पात श्रमसंस्कार शिबिरात सहभागी होण्याची संधी, दीपक नागरगोजे या तरुणाच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. त्यामुळे दीपक यांनी त्यांच्या आईवडिलांचे स्वप्न साकार केले नाही. मुलाने डॉक्टर, इंजिनियर व्हावे किंवा चांगली नोकरी करावी, हे बहुतेक सुशिक्षित मध्यमवर्गीय आईवडिलांचे स्वप्न असते. दीपक यांनी समाजासाठी जगण्याचे ठरवले होते. त्यांनी बारावीनंतर घर सोडले आणि बीडला एका दैनिकात नोकरी धरली. विविध वृत्तपत्रांच्या वाचनामुळे सामाजिक प्रश्नांची जाणीव झाली. प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती आणि निसर्गाचा लहरीपणा यामुळे दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळ येई. शेती व्यवसाय तोट्यात होता. या भागातील सहा ते सात लाख लोक पोटाची खळगी भरण्यासाठी, ऊस तोडणीसाठी अन्य जिल्ह्यांत जात असत. त्यामुळे त्यांच्या बालकांचे बालपण होरपळून निघे. त्यांचे शिक्षण खंडित होई. त्यांच्या पालकांचेही अकाली मृत्यू होत. हे प्रश्न जाणवल्याने दीपक यांनी अशा वंचित मुलांचे संगोपन आणि त्यांच्या शिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरविले. विवाहानंतर दीपक कावेरीसह आनंदवनात आमटे परिवाराला भेटून आले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार दीपक आणि कावेरी यांनी आर्वी येथील स्वतःच्या शेतात शांतिवन प्रकल्पाची स्थापना केली. पत्र्याच्या शेडमध्ये अनाथ मुलांसह संसार थाटला. अत्यंत प्रतिकूल स्थितीत हा प्रकल्प सुरू झाला होता. पाणीटंचाईमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत होत्या. अनाथ मुलांची संख्या वाढत होती. नाम फाउंडेशनचे विश्वस्त नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांची मदत लाभली. अन्य देणगीदारांच्या साहाय्याने शांतिवनचे कार्य विस्तारू लागले. शंभर गरीब कुटुंबांना एकत्र करून त्यांचा एक गट स्थापन केला गेला. एक हजार एकर जमिनीवर प्रयोग करण्याचे ठरले. शेतीसाठी पाणी प्रश्नाचा सखोल अभ्यास केला गेला. बालघाटातील जमीन ही काळ्याकुट्ट टणक पाषाणाची असल्याने शेतकऱ्यांच्या शेततळ्यांच्या प्रयोगाला प्राधान्य दिले गेले. बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा, शिरूर या तालुक्यांत महाराष्ट्रात सर्वात कमी पाऊस पडतो. तोही दरवर्षी पडतोच असे नाही. पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी वर्षभर मिळावे म्हणून पावसाचा प्रत्येक थेंब साठवण्याचे प्रयत्न सुरू झाले. केवळ शेतीला पाणी मिळून शेतकऱ्यांचे अन्य प्रश्न सुटणार नव्हते. शांतिवनची जन्म कथा आणि नंतरचे अनुभव सविस्तरपणे या पुस्तकात मांडले गेले आहेत. एकूण नऊ प्रकरणांतून ''हिरवं सपान'' वाचकांसमोर उलगडते.

दुष्काळ, या पहिल्या प्रकरणात आपल्या शेतीप्रधान देशातील पाण्याचे महत्त्व सविस्तरपणे मांडले आहे. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा या भागाला बरेचदा दुष्काळाला तोंड द्यावे लागते. मराठवाड्यातील बहुतेक सर्व जिल्ह्यांत शेती हाच लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. येथील बहुतांश शेती कोरडवाहू असल्याने आणि पावसाचे कमी होणारे प्रमाण यामुळे शेतीत वर्षभर रोजगार निर्माण होत नाही. शेती उत्पादनही कुटुंबाला पुरेसे होत नाही. मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद हे जिल्हे जास्त दुष्काळी आहेत. बीड जिल्ह्याच्या टोकाला असलेला शिरूर कासार हा तालुका अत्यंत दुष्काळी आहे.आर्वी हे याच तालुक्यातील एक गाव आहे. पाण्याच्या अभावामुळे शेतीच्या समस्या वाढल्या. पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची गरज निर्माण झाली. २००६ पासून पावसाचे प्रमाण कमी कमी होत गेले. परिणामी आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक समस्या वाढल्या. लग्नातील रूढींनुसार खर्च करणे शक्य नसल्याने २०११साली आर्वी गावात एकही लग्नसोहळा झाला नाही. अशा स्थितीत शांतिवनला विविध समाजसेवी संस्थांची आणि व्यक्तींची सक्रिय मदत लाभली.

दुसऱ्या प्रकरणात दीपक नागरगोजे यांच्या शांतिवनची कथा समजते. दीपक यांचे वडील लष्करात होते. त्यामुळे ते त्या काळात लष्कराच्या छावणीत, विविध राज्यांत राहिले. तेथेच दीपक यांचे शिक्षणही झाले. बारावीत असताना, १९९५ साली ते आनंदवनमधील श्रमसंस्कार छावणीत सहभागी झाले. तोच त्यांच्या जीवनाचा ''वळणबिंदू'' ठरला. वृत्तपत्रांच्या वाचनातून दीपक यांना ऊसतोड कामगारांचे प्रश्न समजले. २७ जानेवारी २००० रोजी शांतिवन प्रकल्पाची सुरुवात झाली. तत्पूर्वी त्यांचे कावेरीशी लग्न झाले.

शिक्षणबाह्य पन्नास मुलांचे शिक्षण सुरू झाले. त्यासाठी त्यांना शाळाही सुरू करावी लागली आपल्या गावात विविध सुधारणा करताना झालेल्या विरोधामुळे दीपक यांनी शांतिवन गावापासून दूर, थोड्या अंतरावर वसविले. दुष्काळमुक्त शांतिवनसाठी त्यांनी शेततळ्यांचा वापर केला. त्यासाठी पुण्याच्या जोशी या दांपत्याची मोठी मदत झाली.

नंतरच्या प्रकरणांतून ऊसतोड कामगारांच्या कथा आणि व्यथा समजतात. ''दुष्काळमुक्त आर्वी'' हे प्रकरण, शेततळ्यांचा प्रकल्प सुरू केल्याने काय झाले, हे सोदाहरण स्पष्ट करते. नद्यांचे खोलीकरण केल्याने कोणते लाभ झाले तेही स्पष्ट होते. आर्वीच्या आजूबाजूचे गावही दुष्काळमुक्त करण्यासाठी दीपक यांनी उत्तम सहकार्य केले. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध प्रकारची पिके घेणे कसे शक्य झाले ते स्पष्ट होते. शेवटी सुरेश जोशी यांना दीपक यांनी लिहिलेले दि.५.१०.२०१५ चे पाठविलेले हृद्य पत्र वाचावयास मिळते. संदर्भ ग्रंथांची यादी शेवटी दिली आहे. विविध छायाचित्रांतून ''हिरवं सपान'' कसे साध्य झाले, ते स्पष्ट होते. मलपृष्ठावर दीपक आणि कावेरी नागरगोजे यांच्या कार्याचा सचित्र परिचय होतो. हे पुस्तक महाराष्ट्रातील आणि भारतातील अन्य ठिकाणच्या दुष्काळप्रवण भागांतील विविध शेतीशी निगडित प्रश्न सोडवण्यासाठी निश्चितच मार्गदर्शन करणारे, म्हणूनच उपयुक्त झाले आहे. पुस्तकातील राहून गेलेले काही ठळक मुद्रणदोष खटकतात. ●●

पुस्तकाचे नाव : हिरवं सपान
लेखिका : डॉ. नीलम ताटके
प्रकाशक : उत्कर्ष प्रकाशन
डेक्कन जिमखाना, पुणे-४
प्रथमावृत्ती : ४.१२.२०२३
पृष्ठे :१४१. मूल्य : रु. २५०/-

खर्गेंची आगपाखड आणि वास्तव

'मोफत'च्या संस्कृतीला आडून आडून सर्वंच पक्षांचा विरोध असला, तरी निवडणुका जिंकण्यासाठी राजकीय पक्ष वारेमाप सवंग घोषणा करतात. सत्तेवर आल्यानंतर काही दिवस घोषणांची अंमलबजावणी होते; परंतु नंतर राज्यांची अवस्था कठीण होते. अलिकडेच काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी कर्नाटकबाबत स्वतःच्याच पक्षाच्या सरकारची या मुद्दयावरून कानउघाडणी केली. मात्र ही पश्चातबुद्धी आहे.

अजय तिवारी

कर्नाटक सरकार आर्थिक संकटाचा सामना करत आहे. राज्याची अशी अवस्था होण्यास काँग्रेस पक्षाने निवडणुकीच्या काळात दिलेल्या वारेमाप घोषणा कारणीभूत आहेत. आता याच घोषणांचा आधार घेऊन काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पक्षाचे नेते आणि सरकारवर सडकून टीका केली आहे. जेवढी हमी देता येईल तेवढीच आश्वासने द्या, असे खर्गे यांनी बजावले. अन्यथा, सरकार दिवाळखोरीत जाईल, असा इशारा द्यायला ते विसरले नाहीत. ते म्हणाले, तुम्ही राज्यात पाच हमींचे आश्वासन दिले होते. महाराष्ट्रात पाच हमींचे आश्वासन दिले आहे; परंतु तुमच्या सरकारची स्थिती पाहून आता मी महाराष्ट्रातील नेत्यांना पूर्ण करता येतील, अशीच आश्वासने द्यायला सांगितले आहे. बजेटला अनुरूप अशी आश्वासने द्या. विचार न करता आश्वासने दिल्यास दिवाळखोरी होईल, असा इशारा खर्गे यांनी दिला. हे सरकार अपयशी ठरले, तर त्याचा परिणाम येणाऱ्या पिढ्यांवर होणार आहे. यामुळे बदनामी होईल आणि सरकारला पुढील दहा वर्षे अडचणीला सामोरे जावे लागेल. त्यामुळे अर्थसंकल्पाचा काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. राहुल गांधी आणि आम्ही अर्थसंकल्पाच्या आधारे महाराष्ट्रात लोकांना आश्वासने देऊ. तोपर्यंत कोणत्याही निष्कर्षावर पोहोचू नका, असे ते म्हणाले. सवंग घोषणा अंगलट आल्यानेच त्यांना ही भूमिका घेत आपल्याच नेत्यांचे कान टोचावे लागल्याचे सांगितले जात आहे.

कर्नाटकमधील निवडणुकीत काँग्रेसने जनतेला पाच मोठी आश्वासने दिली होती. यामध्ये गृहलक्ष्मी योजनेंतर्गत महिलांना प्रति महिना दोन हजार रुपये, युवा निधीअंतर्गत बेरोजगार पदवीधरांना दोन वर्षांसाठी तीन हजार रुपये, पदविकाधारकांना दीड हजार रुपये, अन्न भाग्य योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील प्रत्येक कुटुंबाला प्रति व्यक्ती ठराविक प्रमाणात तांदूळ, सखी कार्यक्रमांतर्गत महिलांना सरकारी बसमध्ये मोफत प्रवास आणि गृह ज्योती योजनेंतर्गत प्रत्येक घराला २०० युनिट मोफत वीज देण्याचे आश्वासन काँग्रेसने दिले होते. काँग्रेसने दिलेल्या पाचही आश्वासनांची पूर्तता करायची झाल्यास कर्नाटकची महसुली तूट ६० हजार कोटींवरून १ लाख १४ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढेल आणि ती राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या सुमारे अडीच टक्के असेल. कर्नाटकवर आधीच काही लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. अशा परिस्थितीत हे कर्ज आणखी वाढू शकते. गेल्या वर्षी कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार म्हणाले होते की निवडणुकीच्या वेळी काँग्रेसने दिलेल्या पाच हमींची पूर्तता करण्यासाठी ४० हजार कोटी रुपये बाजूला ठेवले आहेत. त्यामुळे यंदा नवीन विकास प्रकल्पांसाठी पैसे देता येणार नाहीत.

कर्नाटकसह इतर राज्यांची अवस्थाही अशीच आहे. याआधी हिमाचलमध्ये सखू सरकारमध्ये शिक्षकांना पगार मिळण्यावरून गदारोळ झाला होता. आता कर्नाटक सरकारने महिलांसाठी बससेवा प्रथम मोफत करून नंतर या निर्णयातून माघार घेण्याची चर्चा करण्यामधून हेच सूचित होते. शक्ती योजना, कर्नाटकमधील सर्व महिलांसाठी मोफत बस योजनेबाबत पुन्हा विचार करण्याची गरज आहे. २०२३ मध्ये विद्यमान काँग्रेस सरकार सत्तेवर आल्यानंतर ही योजना लागू करण्यात आली. सरकारी बसमधून प्रवास करताना महिलांना तिकिटांचे पैसे देण्याची परवानगी द्यावी, यासाठी सरकारला महिलांच्या एका विभागाकडून विनंत्या येत आहेत. अनेक महिला 'सोशल मीडिया' आणि ईमेलद्वारे संपर्क साधून आपल्याला बस तिकिटांचे पैसे द्यायचे आहेत, पण कंडक्टर पैसे घेत नसल्याचे सांगत असल्याचे डी. शिवकुमार म्हणाले. २०२३ मध्ये कर्नाटकमधील विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसला विजय मिळवून देण्यात या योजनेने महत्त्वाची भूमिका बजावली होती. नंतर पक्षाने शेजारच्या तेलंगणा राज्यात अशीच एक योजना जाहीर केली. तिथे महिलांसाठी बस प्रवास विनामूल्य आहे. 'रेवडी संस्कृती' देशाच्या विकासासाठी अत्यंत घातक आहे. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू म्हणाले की राज्याची आर्थिक स्थिती चांगली नाही आणि म्हणून ते आणि त्यांचे मंत्री दोन महिन्यांचे पगार आणि भत्ते सोडून देत आहेत.

हिमाचल प्रदेशच्या आर्थिक संकटाचे कारण सरकारने दिलेल्या 'मोफत' योजनांच्या अंमलबजावणीमध्ये दडले आहे. अडीच वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत काँग्रेसने अनेक मोफत योजनांचे आश्वासन दिले होते. या आश्वासनांची पूर्तता करण्याचे प्रयत्न सुरू असताना कर्ज आणखी वाढले. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेस सत्तेत येण्यापूर्वी ६९ हजार कोटी रुपयांपेक्षा कमी कर्ज होते. राज्यात काँग्रेसची सत्ता आल्यानंतर मार्च २०२४ पर्यंत ८६ हजार ६०० कोटी रुपयांचे कर्ज झाले. एवढेच नाही, तर मार्च २०२५ पर्यंत हिमाचल प्रदेशचे कर्ज अंदाजे ९५ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढणार आहे. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने अनेक आश्वासने दिली होती. ३०० युनिट मोफत वीज, १९ ते ६० वयोगटातील महिलांसाठी १५०० रुपये दरमहा आणि जुनी पेन्शन योजना परत सुरु करणे अशी लुभावणारी आश्वासने देत काँग्रेसने निवडणूक जिंकली. यानंतर ही आश्वासने पूर्ण करण्याची वेळ आली, तेव्हा राज्य कर्जाच्या ओझ्याखाली दबले. ही आश्वासने पूर्ण करण्यासाठी मोठा खर्च केला जात आहे. काँग्रेस सरकारने महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. ते पूर्ण करण्यासाठी ८०० कोटी रुपये लागतात. मोफत वीज देण्यासाठी सरकारला १८ हजार कोटी रुपयांचा बोजा सहन करावा लागत आहे. त्याचप्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली असून त्यावर एक हजार कोटी रुपये खर्च केले जात आहेत.

रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार, हिमाचल प्रदेशचे कर्ज दर पाच वर्षांनी ३० हजार कोटी रुपयांनी वाढले आहे. सध्या राज्यावर ८६ हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. डोंगरी राज्यातील प्रत्येक व्यक्तीवर १.१७ लाख रुपयांचे कर्ज आहे. 'मोफत' योजनांमुळे राज्यांतर्गत पायाभूत सुविधा, शिक्षण, रोजगार आणि इतर विकासकामांसाठी फारसे पैसेच उरत नाहीत. अशा परिस्थितीत या भागात फारच कमी कामे होतात. हिमाचल प्रदेशचे वार्षिक बजेट ५८ हजार ४४४ कोटी रुपये आहे. यातील सुमारे ४२ हजार कोटी रुपये फक्त पगार, पेन्शन आणि जुने कर्ज फेडण्यासाठी खर्च केले जातात. त्यातच राज्यावर इतके कर्ज आहे की केंद्र सरकारला कर्जाची मर्यादा कमी करावी लागली. सामान्य माणसालाही माहीत आहे की उत्पन्न कमी आणि खर्च जास्त असेल, तर कर्ज घ्यावे लागते. त्याच वेळी, खर्च आणि कर्जे नीट व्यवस्थापित केली नाहीत, तर परिस्थिती अशी बनते की कमाईचे कोणतेही साधन उरत नाही किंवा कर्जदार कर्ज देण्यास तयार होत नाहीत. आता महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशमध्येही भाजप महिलांना दरमहा पैसे देण्याची योजना राबवत आहे. दिल्लीत 'आम आदमी पक्षा'ने मोफत वीज आणि मोफत पाण्यावर निवडणूक जिंकली आणि इतर राज्यांप्रमाणे महिलांना पैसे देण्याच्या योजनेवर काम सुरू आहे. त्याचप्रमाणे दक्षिण भारतातही अनेक पक्ष अशाच योजना राबवत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या म्हणण्यानुसार, मार्च २०२४ पर्यंत सर्व राज्य सरकारांवर एकूण ७५ लाख कोटी रुपयांचे कर्ज होते. मार्च २०२५ पर्यंत ते ८३.३१ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त होईल. देशात सर्वाधिक कर्ज तामिळनाडूवर (८.३४ लाख कोटी) आहे. उत्तर प्रदेशवर ७.६९ लाख कोटी, पश्चिम बंगालवर ७.२२ लाख कोटी, महाराष्ट्रावर सात लाख ८१ हजार कोटी, कर्नाटकवर ५.९७ लाख कोटी, राजस्थानवर ५.६२ लाख कोटी, आंध्र प्रदेशवर ४.८५ कोटी, गुजरातवर ४.६७ लाख कोटी, केरळवर ४.२९ लाख कोटी, मध्य प्रदेशवर ४.१८ लाख कोटी तर तेलंगणावर ३.८९ कोटी रुपयांचे कर्ज आहे. पंजाबवर ३.५१ लाख कोटी, हरियाणावर ३.३६ लाख कोटी, बिहारवर ३.१९ लाख कोटी आणि आसामवर १.५१ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. काही राज्ये तर दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पोहोचली आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेवर याचा विपरीत परिणाम होतो. असे असतानाही निवडणुकीच्या वेळी सवंग घोषणा दिल्या जात आहेत. लोकसभा निवडणूक असो वा राज्याच्या विधानसभा निवडणुका; कोणताही राजकीय पक्ष फुकट पैसे वाटणे थांबवत नाही. भारतातील अनेक राज्यांकडे निधी नाही. सत्तेत आल्यानंतर सत्ताधारी पक्ष अर्थव्यवस्थेकडे लक्ष देत नाहीत. 'फ्रीबीज' दीर्घकाळासाठी हानिकारक असतात, हे समजून घेणे आवश्यक आहे. ●●

महिलांचा प्रतिसाद विजयाची नांदी

महाड

संध्या जगताप यांचे वक्तव्य

। महाड । प्रतिनिधी ।

महाड विधानसभा मतदारसंघात महिलांचा मिळणारा उस्फूर्त प्रतिसाद विजयाची नांदी ठरणार आहे. तसेच, महाड मतदार संघात परिवर्तन होणार असून त्या परिवर्तनाचे साक्षीदार म्हणून नारी शक्तीचा वाटा असल्याचे मत संध्या जगताप यांनी व्यक्त केले आहे.

महाड शहरातील शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या कोटेश्वर तळे येथे शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रचारार्थ प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना संध्या जगताप यांनी महाड विधानसभा मतदार संघात ठिकठिकाणी महिलांचा मिळणारा वाढता प्रतिसाद लक्षात घेता येणारी निवडनुक महिला वर्गाने हाती घेतली आहे. आपले पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांनी या मतदार संघात महिलेला उमेदवारी देत महिलांचा सन्मान केला आहे. हीच नारीशक्ती स्नेहल जगताप यांच्या विजयाची मुख्य भूमिका उचलणार असून महाड मतदार संघात होणाऱ्या परिवर्तनामध्ये नारीशक्ती महत्वपूर्ण भूमिका बाजवता लाडकी बहीण लाडक्या बहिणीला निवडून आणणार आहे असल्याचे मत व्यक्त केले आहे.

● विळे येथे शिंदे गट, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी महाड विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवार स्नेहल माणिक जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला आहे. अतिशय उत्साहापूर्ण वातावरणात कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.

● भागाड येथे शिंदे गटाच्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी महाड विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवार स्नेहल माणिक जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला.

स्नेहल जगताप यांना मताधिक्य देणार

■ बाळ राऊळ यांचा निर्धार

। महाड । प्रतिनिधी ।

महाड विधानसभा मतदारसंघात परिवर्तनाची लाट निर्माण झाली आहे. यामुळे अगामी विधानसभा निवडणूकीत महाड विधानसभा मतदारसंघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप या जास्तीत जास्त मत मिळवून निवडून येतील, असा निर्धार येथील कार्यकर्त्यांनी केला आहे. तसेच, यावेळी बोलताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे बाळ राऊळ यांनी नाते खोऱ्यातून स्नेहल जगताप यांना जास्तीत जास्त मताधिक्य देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. तसेच,

या कार्यक्रमात पुनाडे गावातील शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला आहे.

यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा सहसंपर्क प्रमुख बाळ राऊळ, तालुका प्रमुख आशिष पळसकर, तालुका संपर्क प्रमुख रघुवीर देशमुख, जेष्ठ शिवसैनिक कृष्णा शिंदे, माजी सभापती संजय चिखले, विभाग प्रमुख राजू रेवणे, संदीप खोपडे यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तांबट भुवन येथे प्रचार फेरी

। महाड । प्रतिनिधी ।

महाड शहरात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रचारार्थ महाड नगरपालिका हद्दीत प्रचार फेरीचे आयोजन शुक्रवारी (दि.८) करण्यात आले होते. यावेळी स्वर्गीय माणिकराव जगताप यांचे स्वप्न स्नेहल जगताप यांना आमदार करून पूर्ण करणार असल्याची ग्वाही सुदेश कळमकर यांनी कृषीवल सोबत बोलताना दिली आहे.

तांबडभुवन येथील प्रचार फेरीत शुशात कदम, अमोल पवार, निरंज चौधरी, आशिष चिखले, गौरव जाधव, चंद्रशेखर पवार, मयूर भुवड, संकेत वारंगे, निलेश वारंगे, सृष्टी जगताप, मोरे, श्रद्धा पवार, अश्विनी शिंदे, गौरी जाधव, लोचन भुवड, नातेकर, पूजा जगताप, सोनल शिंदे, सचिन शिंदे, अंकुश खैरकर, सुयोग लाड आदी उपस्थित होते.

स्नेहल जगताप यांचे विरोधकांना धक्के

। महाड । प्रतिनिधी ।

दाखणे येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी महाड विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला आहे. अतिशय उत्साहापूर्ण वातावरणात कार्यकर्त्यांनी प्रवेश केला आहे. यावेळी स्नेहल

जगताप यांनी सांगितले की, या भागात एमआयडीसी असून स्थानिक तरुण बेरोजगार आहेत. महाड तालुक्यातील बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळवून त्यांना आर्थिक सक्षम करणार. तसेच, तरुणांचा सहभाग मला निश्चितच विजय मिळवून देणारा ठरेल, असे देखील स्नेहल जगताप म्हणाल्या.

यावेळी बाबुशेठ खानविलकर, तालुका प्रमुख अण्णा अधिकारी, जनार्दन मानकर, प्रभाकर मानकर, चंद्रकांत पवार, शिवानी म्हामुणकर, रणजित मालोरे, डॉ. परेश उभारे, अनिल मोरे, संदीप जाधव, विद्याताई नलावडे यांच्यासह विभागातील सर्व शिवसैनिक, युवा सैनिक महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

● महाड येथील नवेनगर वरंध जिल्हा परिषद मतदार संघातील धरणाची वाडी व कुंभारकोंड येथील शिंदे गटातील कार्यकर्त्यांनी महाड विधानसभा नेते हनुमंत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला आहे. या मतदारसंघात उद्धव ठाकरे यांच्या विजयाची मशाल पेटवणार असल्याचा विश्वास प्रवेशकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

विक्रमी मतदान करण्यासाठी सज्ज

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत विधानसभा मतदारसंघात महायुतीचे विद्यमान आमदार यांनी हजारो कोटींची विकास कामे केली आहेत. परंतु, ती विकासकामे कुठे झाली, याचा अभ्यास कर्जत आणि खालापूर तालुक्यातील सुज्ञ जनता करीत आहे. यामुळे निवडणुकीच्या काळात त्यांच्यावर टीका करण्यात माल अजिबात रस नसून महाविकास आघाडीचा प्रत्येक कार्यकर्ता मशाल हाती घेऊन मतदारसंघ पुन्हा भगवामय करण्यासाठी कामाला लागला आहे. असा निर्धार महाविकास

आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांनी व्यक्त केला.

कर्जत मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांच्या प्रचारार्थ बीड बुद्रुक जिल्हा परिषद गटात बूथ संवाद दौरा आयोजित करण्यात आला होता. यावेळी नितीन सावंत यांनी बोलताना सांगितले की, जनता आता यांना कंटाळली असून प्रत्येक मतदार विधान सभा निवडणुकीच्या मतदानाच्या तारखेकडे लक्ष ठेवून आहे. २० तारखेला मशालीवर विक्रमी मतदान करण्यासाठी कर्जत आणि खालापूरमधील सर्व जनता सज्ज आहेत. यामुळे मला कोणी हजारो कोटींची विकास कामे केली याचा अभ्यास करायचा नाही, जनताच ती कामे शोधत गावोगावी फिरत आहेत. आणि तेच मतदानातून आपला हक्क बजावून महाविकास आघाडीला विजयी करतील, असा विश्वास देखील नितीन सावंत यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी सुवर्णा जोशी, ॲड. गोपाळ शेळके, ॲड. प्रदीप सुर्वे, सुरेश बोराडे, प्रमिला बोराडे, जगदीश ठाकरे, कार्यकर्ते रॅलीत सहभागी झाले होते.

शिवसेना ठाकरे गटात पक्ष प्रवेश

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत विधानसभा मतदारसंघातील खोपोली शहरातील शिळफाटा परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षामध्ये प्रवेश केला आहे. महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार तथा शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या नेतृत्वावर विश्वास टाकत शिवसेनेच्या मध्यवर्ती शिवालय कार्यालयात पक्षप्रवेश पार पडला.

कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघात अनेक उमेदवारांकडून मतदारांना आमिषे दाखवण्यात येत आहे. तरी असंख्य निष्ठावंत कार्यकर्त्यांनी नितीन सावंत यांच्या नेतृत्वावर प्रभावित होत अमिषांना पायदळी

तुडवत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात सामील होत आहेत. यावेळी कर्जत विधानसभेचे उमेदवार नितीन सावंत, कर्जत तालुकाप्रमुख उत्तम कोळंबे, जगदीश ठाकरे, माजी उप सभापती पंढरीनाथ राऊत, सचिन गायकवाड, कृष्णा जाधव, सुजल गायकवाड, सुमित चंदन, धर्मेश परमार, अविनाश शिर्के आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

अध्यक्षपदी विजय तोडणकर यांची नियुक्ती

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे माजी तालुका अध्यक्ष विजय तोडणकर यांची काँग्रेस पक्षाच्या श्रीवर्धन मतदार संघाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.राष्ट्रीय काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी ही नियुक्ती केली असून श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाची जबाबदारी विजय तोडणकर यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. जवळ येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीत श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातील काँग्रेस कार्यकर्ते यांनी तोडणकर यांच्या मार्गदर्शनाखाली काम करायच्या सूचना यावेळी जिल्हाध्यक्ष घरत यांनी केल्या आहेत. तसेच, मविआचे उमेदवार अनिल नवगणे यांना काँग्रेस पक्षाचा जाहीर पाठिंबा दर्शवला असून सर्वांनी महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल नवगणे यांचे काम करण्याचे आदेश दिले आहेत.

सुरेश खैरे यांचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन

। पाली । वार्ताहर ।

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकाप नेते सुरेश खैरे यांनी मंगळवारी (दि.५) पाली यथे सुधागड तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या सभेचे आयोजन केले होते. यावेळी सुरेश खैरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना, अतुल नंदकुमार म्हात्रे हेच पेण-सुधागड आणि रोहा या मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार

असल्याचे सांगितले आहे.

पालीतील बैठकीमध्ये सुरेश खैरे यांनी सांगितले की, निवडणूक आयोगाने शिट्टी ही निशाणी दिली आहे. हे निवडणूक चिन्ह लोकांपर्यंत पोहचवा आणि आपल्या उमेदवाराला भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन सुरेश खैरे यांच्यावतीने करण्यात आले आहे. सुधागड तालुक्याच्या विकास कामात शेतकरी कामगार पक्षाचे योगदान मोठ्या प्रमाणावर आहे. लवकरच तालुक्यातील महाविकास आघाडीच्या पदाधिकारी यांच्या समवेत चर्चा करून प्रचाराला सुरुवात केली जाईल, असे सुरेश खैरे यांच्यावतीने सांगण्यात आले.

कर्जत शहरात प्रचाराचा शुभारंभ

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या प्रचाराचा जोर वाढला आहे. आता कर्जत शहरातील पदाधिकाऱ्यांनी कर्जत शहरात प्रचाराचा शुभारंभ केला असून शिवसेना (उद्धव ठाकरे) महिला आघाडी जिल्हा संघटक सुवर्णा जोशी यांनी कर्जत शहरात प्रचाराचा शुभारंभ केला आहे.

कर्जत शहरातून महाविकास आघाडीचे तसेच शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार नितीन सावंत यांचा प्रचाराचा नारळ फोडण्यात आला. माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी व माजी नगरसेवक संतोष पाटील यांच्या उपस्थितीत प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

नेमबाजीत रिया मिसाळला रौप्य पदक

। मुंबई । प्रतिनिधी ।

११ वी पश्चिम विभागीय (राष्ट्रीयपूर्व) नेबाजी स्पर्धा २१ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत पार पडली. या स्पर्धेत चुरस होती, मात्र लक्ष्य शूटिंग क्लबची शुटर रिया अनिल मिसाळ हिने १० मिटर एअर रायफल उप युवा महिला गटात रौप्यपदक जिंकले आहे. या

स्पर्धेसाठी रियाने प्रशिक्षक रमेश माळी यांच्या मार्गदर्शनाखाली लक्ष्य शूटिंग क्लब मध्ये बरीच मेहनत घेतली होती. त्याचेच प्रतीबिंब तिच्या रौप्य पदाकातून दिसले असल्याचे रीयाचे वडील अनिल मिसाळ यांनी सांगितले आहे. तर प्रशिक्षक रमेश माळी यांनी रियाचे भवितव्य उज्वल असल्याचे सांगितले.

महेंद्र घरत यांची भेट

। उरण । प्रतिनिधी ।

सध्या विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी लढत होत असताना उमेदवारांनी या निवडणुकीत धुमाकूळ घातलेला आहे. यामुळे अधिकृत उमेदवारांना महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी अधिकृत उमेदवारांचा प्रचार करून त्यांना बहुमताने निवडून आणण्यासाठी स्वतःला झोकून द्यावे म्हणून काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांचे आशीर्वाद घेण्यासाठी येत आहेत. दरम्यान, कर्जत-खालापूर विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांनी काँग्रेसचे कर्जत, खालापूर, खोपोली शहराच्या

अध्यक्षांसह महेंद्र घरत यांची भेट घेतली. पुढील वाटचालीबाबत चर्चा करून जिल्हाध्यक्षांचे आशीर्वाद घेतले. यावेळी कर्जत तालुका काँग्रेस अध्यक्ष संजय गवळी, खोपोली शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन, खालापूर तालुका अध्यक्ष कृष्णा पारंगे, युवक काँग्रेस रायगड जिल्हाध्यक्ष निखील डवले आदी उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)